## व्यवसाय / धंधा

**अभिषेक मार्केटिंग येथे होलसेल** भावात बेकरीचे माल मिळेल. १० रु. विक्रीचे टोस्ट, बटर, खारी, ब्रेड, बनपाव, क्रिमबन, क्रीमरोल ७.५० रु. २० रु. विक्रीचे टोस्ट, बटर, खारी, ६ नग कपकेक, बिस्किट, ब्रेड, क्रिमबन १५ रु. मिळेल. ३० रु विक्रीचे टोस्ट, बटर, खारी, ब्रेड २२.५० पैसे. ४० रु. विक्रीचे टोस्ट, बटर, खारी ३० रु मिळेल. तुळजापूर वेस, गोल तालीम जवळ, सोलापूर.

**मो: ९४२२६५११०१**



दैनिक सोलापूर

असत्याच्या दुनियेतील सत्य शोधणारे सायं दैनिक

# कटूसत्य

किंमत ५ रुपये

Email - katusatya@gmail.com

www.katusatyanews.com



**नका कॅन्सरला आमंत्रण देऊ...**

दारू... अंमली पदार्थ...

गॅरंटेड सुटण्यासाठी...



व्यसन + टेन्शन + भिती + चिंता + नैराश्य + हस्तकंप + निद्रानाश..

(महाराष्ट्राचे पसंतदिदा नशामुक्ती सेंटर)

**डॉ. पालवे नशामुक्ती केंद्र**

फोन: 9552619752

कॉल / व्हॉटस्‌अॅप करा... दारू... अंमली पदार्थ... राम राम करा...

501% रिझल्ट



सोलापूर | RNI No . MAHMAR 2006/17624 | वर्ष १९ वे, अंक २६७ वा | गुरुवार, दि. ०५ जून २०२५ | पाने ४ | पोष्ट परवाना: - SLP/04/2023-2025 Posted at - R.M.S.Post Office SOLAPUR


# सोलापूरात हगवणे प्रकरणाची पुन्नरावृत्ती

## गर्भवती आशाराणीनं स्वत:ला संपवलं





**पैसे आणि चार चाकी वाहनासाठी छळ**

सासरच्या मंडळींनी पैसे आणि चार चाकी वाहनासाठी छळ केल्यानेचं मुलीने टोकाचे पाऊल उचलल्याची मृत महिलेच्या वडिलांनी पोलिसांना दिलेल्या फियार्दीमध्ये म्हटलं आहे. काल (मंगळवारी) मोहोळ तालुक्यातील चिंचोलीकाटी येथे राहणाऱ्या आशाराणी पवन भोसले या 22 वर्षीय महिलेने गळफास घेत आत्महत्या केली होती. मृत आशाराणी भोसले हिला अवघ्या तीन वर्षांची चिमुकली मुलगी असून ती दुसऱ्यांदा गर्भवती होत्या. 2019 साली आशाराणी हिचे मोहोळ तालुक्यातील पवन भोसले याच्याशी विवाह झाला होता. तर आशाराणीची बहीण उशाराणी हिचा विवाह देखील पवन भोसले याच्या भावासोबत ज्ञानेश्वर सोबत झाला आहे.

**मोहोळ (कटूसत्य वृत्त):-** राज्यभरात वैष्णवी हगवणे आत्महत्या प्रकरणाची चर्चा असतानाच आता सोलापुरमध्ये देखील सासरच्या जाचाला कंटाळून आशाराणी भोसले या 22 वर्षीय विवाहितेने गळफास घेऊन आपलं जीवन संपवल्याची घटना समोर आली आहे.

या प्रकरणात देखील चारचाकी आणि पैशाच्या हव्यासासाठीच सासरकडच्यांनी सुनेचा छळ केल्याचा आरोप मृत महिलेच्या वडिलांनी केला आहे. मोहोळ तालुक्यातील चिंचोलीकाटी येथील विवाहितेच्या आत्महत्या प्रकरणी मृत महिलेच्या पतीसह सासू सासऱ्याच्या विरोधात गुन्हा नोंद करण्यात आला आहे. या प्रकरणी आशाराणी भोसले हिचा मृत्यू नसून हत्या असल्याचा आम्हाला संशय आहे, असंही तिच्या माहेरच्यांनी म्हटलं आहे.

कुटुंबियांनी याबाबत एबीपी माझाशी बोलताना सांगितलं की, मोठी मुलगी उशाराणी हिचा ज्ञानेश्वर भोसले याच्याशी 2019 मध्ये विवाह झाला होता. त्यानंतर त्याचा लहान भाऊ पवन यांनी आमची धाकटी मुलगी आशाराणी हिला पळवून नेलं आणि प्रेमविवाह केला. मात्र मुलगी झाल्यापासून तीचा छळ सुरूच होता. अनेक वेळा तिच्या कुटुंबियांना व्हिडीओ कॉल करत आशाराणी हिला मारहाण केली जात होती. आशाराणी माहेरी निघून आल्यावर पोलिसात तक्रार दिली. पोलिसांनी समजून सांगितल्याने आम्ही मुलीला नांदायला पाठवलेलं होतं. काल (मंगळवारी) तिने टोकाचा पाऊल उचललं. तिला तीन वर्षांची वैष्णवी नावाची चिमुकली मुलगी आहे, अशी माहिती देखील आशाराणीच्या कुटुंबियांनी दिली आहे.

**पळवून नेऊन लग्न, मुलगी झाल्यानंतर त्रास**

आशाराणीच्या मोठ्या बहिणीच्या दीराने तिला आपल्या प्रेमाच्या जाळ्यात ओढलं. दोघांनी पळून जाऊन लग्न देखील केलं. मात्र, मुलगी झाल्यापासून तीचा छळ सुरू होता. अनेक वेळा तिच्या माहेरच्यांना व्हिडीओ कॉल करत आशाराणी हिला मारहाण केली जात होती, अशी संतापजनक माहिती देखील समोर आली आहे.

**बहीण देखील माहेरी**

आशाराणी भोसले हिची मोठी बहीण उशाराणी हिचा विवाह मोहोळ तालुक्यातील चिंचोलीकाटी येथे राहणाऱ्या ज्ञानेश्वर भोसले यांच्याशी 2019 साली झाला. त्यावेळी धाकटी मुलगी आशाराणी आणि ज्ञानेश्वर यांचा धाकटा भाऊ पवन यांच्यात प्रेम संबंध निर्माण झाले. पवन यांने आशाराणी हिला पळवून नेत तिच्याशी विवाह केला. लग्नानंतर दोन वषार्नी आशाराणी हिला मुलगी झाली. वैष्णवी असे या मुलीचे नावं आहे. वैष्णवीच्या जन्मनंतर आशाराणीचा छळ सुरू झाला. चारचाकी कार हवी, खचार्साठी पैसे हवे यासाठी सातत्याने तीचा छळ सुरु झाला. दोन वेळा तर मुलीच्या आई वडिलांना व्हिडीओ कॉल करून देखील पवन याने मारहाण केली. 2024 साली मारहाण सहन न झाल्याने आशाराणी ही माहेरी रायचूरला निघून आली. तेव्हा पत्नी नांदायाला येतं नाही म्हणत पवन याने पोलिसात तक्रार दिली. महिला तक्रार निवारण केंद्राने दोन्ही कुटुंबियांची समजूत घातली. त्यानंतर आशाराणी हिला पुन्हा नांदवण्यास पाठवण्यात आलं. मात्र वर्षभराच्या आत ही दुर्दैवी घटना घडली. काल आत्महत्या झाल्यापासून मृत अशाराणी हिची तीन वर्षांची मुलगी वैष्णवी ही सासरच्या ताब्यात होती. आता काही वेळा पूर्वी वैष्णवीला आशाराणी यांच्या माहेच्या कुटुंबियांना देण्यात आलं आहे.

मयत आशाराणी हिची मोठी बहीण उशारणी हिला देखील सासरमध्ये असाच त्रास सुरु आहे. त्यामुळे दोन महिन्यापासून ती देखील रायचूर येथे माहेरी आहे.

**सासू अलका आणि सासरा बलभीम भोसले त्रास द्यायचे**

मागील तीन वर्षापासून आशाराणी हिला नवरा पवन हा चारचाकी वाहन खरेदी करण्यासाठी आणि खचार्सासाठी माहेरहुन पैसे आण म्हणून मारहाण करत होता. तर सासू अलका भोसले आणि सासरा बलभीम भोसले हे देखील मुलीला स्वयंपाक नीट करता येतं नाही, मुलाला इज्जत देतं नाही असे म्हणत मानसिक छळ करतं होते. 2024 मध्ये देखील पती पवन याने आशाराणी भोसले हिला मारहाण करून माहेरी पाठवलं होतं. त्यावेळी महिला तक्रार निवारण केंद्राच्या मदतीने पती पत्नीचे समुपदेशन करण्यात आले होते. मात्र त्यानंतर देखील पती पवन भोसले, सासू अलका भोसले, सासरा बलभीम भोसले यांच्याकडून त्रास देणं सुरूच होते. त्यामुळेच मुलगी आशाराणी भोसले हिने टोकाचे पाऊल उचलत आत्महत्या केल्याची फिर्याद आशाराणीचे वडील नागराज डोणे यांनी दिली आहे. त्यांच्या फियार्दीवरून मृत आशाराणीचे पती पवन भोसले, सासू अलका भोसले, सासरा बलभीम भोसले या तिघांच्या विरोधात गुन्हा दाखल करण्यात आला आहे.

**छोट्या छोट्या कारणांवरून वाद**

चार चाकी वाहन घेण्याकरता आणि इतर खचार्साठी माहेरवरून पैसे घेऊन ये. तुला नीट स्वयंपाक करता येत नाही. तू नवऱ्याची इज्जत करत नाही, असं म्हणून तिचा वारंवार मानसिक व शारीरिक त्रास दिला जात होता. या त्रासाला कंटाळून तिने आत्महत्या केल्याप्रकरणी नवरा पवन भोसले, सासू अलका भोसले व सासरा बलभीम भोसले यांच्यावर मोहोळ पोलीस ठाण्यात गुन्हा दाखल करण्यात आला आहे.

आशाराणी भोसले प्रकरणतील तिन्ही आरोपी पोलिसांच्या ताब्यात आहेत. पती पवन भोसले, सासू अलका भोसले, सासरे बलभीम भोसले या तिघांना पोलिसांनी अटक केली आहेत. चारचाकी गाडी आणि खचार्साठी पैसा पाहिजे म्हणून पती पवन हा सातत्याने छळ करतं असल्याने आशाराणी हिने आत्महत्या केल्याचा आरोप माहेरच्यांनी केला आहे. या प्रकरणी मोहोळ पोलीस ठाण्यात पवन भोसले, अलका भोसले, बलभीम भोसले या तिघां विरोधात BNS कलम 80(2), 115(2),3(5) नुसार गुन्हा दाखल करण्यात आला आहे. रात्रीच नवरा पवन भोसले याला पोलिसांनी अटक केली होती, त्यानंतर आरोपी सासू आणि सासऱ्याला देखील आता पोलिसांनी अटक केली आहे.

## म्हैसाळच्या लाभ क्षेत्रातील शेतीच्या पाण्याचे प्रश्न मार्गी लावू



**मुंबई (कटूसत्य वृत्त):-** सोलापूर जिल्ह्यातील मंगळवेढा तालुक्यातील ८ गावांसाठी सिंचनासाठी 774 हे क्षेत्र मंजूर असून उर्वरीत 2000 ते 3000 हे लागवडीलायक क्षेत्र वंचित आहे. सदर सिंचन क्षेत्रामध्ये वाढ करून पाण्याची वाढीव तरतुद करण्यात यावी. उमदी वितरीकेवरील मंगळवेढा तालुक्यातील मौजे सलगरे (ब्रु.), सलगरे (खुर्द), आसबेवाडी, लवंगी, शिवंगी, येळगी, सोड्डी व हुलजंती या ८ गावांसाठी म्हैसाळ योजनेअंतर्गत उमदी वितरीकेतून येथून थेट स्वतंत्र बंदिस्त नलिकेव्दारे सिंचनासाठी पाणी देण्याच्या प्रस्तावास मंजूरी मिळण्याकरीता ग्रामस्थांनी खासदर प्रणिती शिंदे यांच्याकडे मागणी केली होती. याकरीता सोलापूर जिल्हयातील मंगळवेढा तालुक्यातील ८ गावांच्या सिंचनासाठी म्हैसाळ योजनेअंतर्गत उमदी वितरीकेवरील 774 हेक्टर मंजूर असून ते क्षेत्र वाढवून 5000 हेक्टर करून पाण्याची वाढीव तरतुद करून थेट स्वतंत्र बंदिस्त नलिकेव्दारे सिंचनासाठी पाणी देण्याच्या प्रस्तावास मंजूरी देऊन निधीची तरतुद करण्यात यावी.

सोलापूर जिल्ह्यातील मंगळवेढा तालुक्यातील मौजे मारोळी, शिरणांदगी, पडुळकरवाडी व लवंगी या तलावामध्ये पुरेसे पाणी नसल्यामुळे शेतकऱ्यांना, जनावरांना व पिकांकरीता पाण्याची अडचणी निर्माण होत आहे. याकरीता मंगळवेढा तालुक्यामधील मौजे मारोळी, शिरणांदगी, पडुळकरवाडी व लवंगी येथील तलाव म्हैसाळ योजनेअंतर्गत टॅंक फिडिंग बंदिस्त नलिकेद्वारे भरण्याकरीता ग्रामस्थांनी खासदार प्रणिती शिंदे यांच्याकडे मागणी केली होती. याबाबतचा टॅंक फिडिंग बंदीस्त नलीकेव्दारे पाणी भरण्याचा प्रस्ताव मंजूरीकरीता कार्यकारी संचालक, कृष्णा खोरे विकास महामंडळ यांच्याकडे पाठविण्यात आला आहे. सोलापूर जिल्ह्यातील मंगळवेढा तालुक्यामधील मौजे मारोळी, शिरणांदगी, पडुळकरवाडी व लवंगी येथील (पान 2 वर..)

# गरीब विद्यार्थ्यांचे देशमुख सर

**लेखन : अविनाश देशमुख**

दहिवली बरोबर टेंभुर्णी आणि केम या गावाच्या मध्यभागी असणारे गाव. साधारण सातशे उंबरा असणारे गाव. सन 2000 सालापर्यंत तसे दुष्काळी म्हणूनच या गावाची ओळख. वडील रामचंद्र सर्जेराव देशमुख (मामा) काही काळ लोकांच्या घरातील पाणी वाहून आपला उदरनिर्वाह केला. शेती असून ही म्हणावे तसे उत्पन्न कधीच निघाले नाही. आई फुलाबाई रामचंद्र देशमुख यांनी प्रचंड कष्ट करत सर्वच मुलांना स्वतच्या पायावर उभा करण्याचा प्रयत्न केला. बाळासाहेब देशमुख सरांचे आजोळ तांबवे ता.माढा येथील आहे. थोरले मामा कृषी अधिकारी शाहुराव खटके साहेब हे आजोळाकडील पहिले शिक्षित शासकीय नोकरदार झाले. आई फुलाबाई यांनी तीन मुलांना आपल्या माहेरातच लहानाच मोठे केले. शाहुराव खटके, देवराव खटके, भिमराव खटके या तीनही मामांनी आपल्या मुलासारखचे या भाचेकंपनीला कायम जपले. कधीच परकेपणा जाणवून दिला नाही. बाळासाहेब देशमुख सर मात्र दहिवलीतच लहानाचे मोठे झाले. कधी लोकांच्या शेळ्या राखून आपले शालेय शिक्षण त्यांनी पूर्ण केले. अकरावी-बारावी पासून पदवीपर्यंत त्यांनी शिक्षण कुर्डूवाडी येथे घेतले. सरांचा स्वभाव प्रचंड जिद्दी आहे. शिक्षण घेत असताना अनेक अडचणीचा सामना त्यांना करावा लागला, लोकांचा मान-अपमान सहन करावा लागला परंतु जिद्दीने या सर्वांवर मात करीत त्यांनी आपले शिक्षण पूर्ण केलेच.

बाळासाहेब देशमुख सर यांनी शिक्षण पूर्ण केल्यानंतर सन 1989 साली आपल्या शिक्षक म्हणून नोकरी करण्यास सुरुवात केली. प्रथम त्यांनी केम प्रशाला केम येथे 1989 ते 1991 सालापर्यंत, भैरवनाथ विद्यालय आलेगाव बु येथे 1995 सालापर्यंत विद्यादान केले. या काळी शाळेला कोणतेही अनुदान नसताना त्यांनी कायम संस्था जपत अनेक विद्यार्थ्यांना मनापासून घडवण्याचे काम केले. त्यानंतर सन 1996 ते 2022 पर्यंत राजाभाऊ तळेकर विद्यालय केम येथे सलग 25 वर्ष विद्यादान केले. या काळात त्यांनी दिन-दलित, गोरगरीब, कष्टकरी समाजातील मुलांना त्यांच्या गावावरून आणून या विद्यालयात शिकवले. आज पोपळज गावातील अमोल कांबळे सारखा विद्यार्थी रेल्वे खात्यात कामाला लागला याचे सर्व श्रेय देशमुख सरांना जाते. तो म्हणतो आमच्या घरातील गरीब दूर झाली आणि आमचा संसार सोन्याचा झाला यामागे देशमुख सरांचे असलेले योगदान आम्ही उभ्या आयुष्यात विसरून शकत नाही. सरांच्या हाताखाली शिकलेले विद्यार्थी आज विविध क्षेत्रामध्ये सक्षमपणे काम करत आहेत. कित्येक विद्यार्थींचे संसार सोन्याचे झाले, घरात सुखासमाधाना लाभले यापेक्षा मोठी सरांसाठी गुरुदक्षिणाच होऊ शकत नाही. या गोरगरीब विद्यार्थ्यांनीच सरांना गोरगरीबांचे सर अशी पदवी दिली जी कायम त्यांच्या नावासोबत राहिली.

दररोज सकाळी बरोबर 10 वाजता सर शाळेत हजर राहायचे, कोणतेही महत्त्वाचे काम असले तरी त्यांची रजा कधीच नसायची. शाळा आणि सर हे ठरलेले समीकरण होते. शाळेत आयोजित केलेल्या प्रत्येक कार्यक्रमाचे सूत्रसंचालन त्यांनी आपल्या खर्डा आवाजात केले आहे. शाळेतील सहल तर देशमुख सर शिवाय कधीच निघाला नाही. एखाद्या विद्यार्थ्यांकडे सहलीत खर्चासाठी पैसे नसतील तर सरांनी त्याची गरज ओळखून स्वतःजवळील पैसे त्या विद्यार्थ्याला दिले आहेत. दिल्ली, कोलकाता, हरिद्वार, ओरिसा, म्हैसूर असे कित्येक स्काऊट गाईड कॅम्प त्यांच्या नेतृत्वाखाली शाळेने पार पाडले आहेत. तालुकास्तरीय, जिल्हास्तरीय कित्येक स्पर्धेत त्यांच्या नेतृत्वाखाली शाळेला बक्षीसे मिळाली आहेत. सर हे फक्त वगार्पुरते न शिकवता विद्यार्थ्यांचा सर्वांगीण विकास कसा होईल यावरच भर देत राहिले.



बाळासाहेब देशमुख सर यांनी शाळे बरोबर आपल्या कुटुंबावर ही कायम लक्ष दिले. पडीक असलेल्या जमिनीवर त्यांनी कष्टाने हिरवी चादर पांघरली. सर्व शेती बागायती करुन कुटुंबात सर्वांना चांगले दिवस आणले. प्रत्येक भावाची शेती चांगली व्हावी यासाठी प्रयत्न केले. मोठे भाऊ रावसाहेब देशमुख, दोन नंबरचे भाऊ शशिकांत देशमुख, चार नंबरचे भाऊ भारत देशमुख यांच्या समवेत त्यांनी कायम आपुलकीचे संबंध जोपसले. कोणत्याही कुटुंबातील निर्णयात प्रत्येक जण एकमेकांचा सल्ला घेऊनच पुढील पावले टाकत आहेत. सरांनी आपला मुलगा प्रदिप देशमुख व मुलगी सौ. प्रियंका अतुल पाटील यांना उच्चशिक्षित तर केले पण पुतणे निलेश देशमुख (प्राथमिक शिक्षक, मराठा सेवा संघ माढा तालुकाध्यक्ष), महेश देशमुख (सेफ्टी ऑफिसर, विठ्ठलराव शिंदे कारखाना), उमेश देशमुख (M.A.D.Ed), अविनाश देशमुख (स्वीय सहायक), चैतन्य देशमुख (उद्योजक) सौ.सुप्रिया विनोद शिंदे, सौ.संध्या सागर झिंजाडे (M.Sc.phD.) या सर्वांना शिक्षित करुन चांगले आयुष्य जगण्यासाठी योगदान दिले. आज कुटुंबातील प्रत्येक जण आपल्याला पायावर सक्षमपणे उभा आहे याचे श्रेय बाळासाहेब देशमुख सर यांना जाते. मुलगा प्रदिप यांने स्वकर्तृत्वावर स्वतःचा व्यवसाय, शेती उभी केली आहे. मुलगी प्रियंका हेही उच्चशिक्षित असून तिच्या संसारात पती अतुल पाटील (रेल्वे अधिकारी) यांची साथ लाभली आहे. नातवंडे अर्पित, प्रज्वल, प्रितुषा यांच्यामध्ये सर पूर्णपणे रमले आहेत.

आज सरांची 36 वर्ष 11 महिनेची सेवापूर्ती होत आहे. खरंतर सर माणूस स्वतःचे आयुष्य ग्रेटच जगले. शिक्षण, समाजकारण आणि राजकारण अशा क्षेत्रात ते सदैव बापमाणूस म्हणूनच जगतील. करमाळ्याचे मा.आ.संजयमामा शिंदे हे त्यांचे वर्गमित्र आहेत. मा.आ.बबनदादा शिंदे यांनी सरांना शालेय शिक्षणापासून मदत केली. सर आजपासून सेवापूर्ती करुन निवृत्त होत असताना केलेले विद्यादान सदैव चिरतरुण राहणारे आहे. गोरगरीब, सर्वसामान्य विद्यार्थ्यांना सर नेहमी आपले वाटले. दिवस किती लवकर निघून गेले, आज सेवानिवृत्त होत असताना पुढील आयुष्य ही सर भरभरून आपले आयुष्य आनंदात जगतील असा विश्वास आहे. आई-वडीलांच्या आशीवार्दाने त्यांनी खूप माणसे कमावली, मुख्याध्यापक पदावर जाऊन ही मातीत राहून त्यांनी विद्यार्थ्यांसाठी काम केले. जिल्हास्तरीय आदर्श मुख्याध्यापक पुरस्कार त्यांना मिळाला तो त्यांना शोभून दिसणार आहे. सर तुम्ही आयुष्य भर गोरगरीबांचे विद्यार्थ्यांचे सर म्हणूनच राहावे आणि शतायुषी व्हावे याच आमच्या सदिच्छा... !

**समस्त देशमुख परिवार...!**

## संपादकीय

# महिला आयोगाचा वाद

राज्य महिला आयोगाच्या अध्यक्षा रूपाली चाकणकर आणि महिला आयोगाची कामकाज पद्धती हा सध्याचा राज्यातला चचेर्चा हॉट टॉपिक ठरत आहे. वैष्णवी हगवणे प्रकरणावरून सुरू झालेला वाद आता थेट रूपाली चाकणकर यांच्याऐवजी तेथे दुर्सया बिगर राजकीय व्यक्तींची नियुक्ती करावी या मुद्द्यापर्यंत येऊन पोहोचला आहे. आज महाविकास आघाडीच्या शिष्टमंडळाने त्यासाठी राज्यपालांची भेट घेऊन चाकणकर यांच्याऐवजी दुर्सया बिगर राजकीय व्यक्तींच्या नियुक्तीची मागणी राज्यपालांकडे केली. त्याआधी महिलांचे शिष्टमंडळ आज याच मागणीसाठी राज्यपालांना भेटण्यासाठी गेले होते, पण तेथे त्यांना सुरुवातीला अनुमती न मिळाल्याने तेथेही नाट्य पाहायला मिळाले. या सगळ्या घडामोडी घडत असतानाच आज अचानक विधान परिषदेच्या उपसभापती नीलम गोंहे यांनीही या वादंगात भरच घातलेली दिसून आली. त्यांनी आज स्वतःच्या अध्यक्षतेखाली महिला आयोगाच्या कामकाजाची आढावा बैठक घेतली. मुख्य म्हणजे या बैठकीला स्वतः रूपाली चाकणकर याही उपस्थित होत्या. मात्र, या बैठकीत काही ठराविक लोकांना निमंत्रणे दिली गेली, बाकीच्या संबंधित लोकांना निमंत्रणे दिली गेली नाहीत तोही वाद आजच बर्यापैकी रंगला होता.
मुळात नीलम गोंहे यांनी कोणत्या अधिकारात ही बैठक घेतली हा आक्षेपाचा मुद्दा काही पक्षातल्या महिला नेत्यांनी उपस्थित केला आहे. कुठल्याही प्रकरणात स्वतःला केंद्रस्थानी ठेवूनच काम करण्याची नीलमताईंची पद्धत आहे, असे आक्षेप काही महिला नेत्यांनी घेतले आहेत. ठाकरे गटाच्या नेत्या सुषमा अंधारे यांचे म्हणणे असे की, महिला आयोग हा विषय राज्यपालांच्या अखत्यारीत असल्याने त्याची आढावा बैठक राज्यपालांनी घेतली असती तर ते संयुक्तिक ठरले असते. नीलमताईंचा या बैठकीशी संबंध काय, असा आक्षेप त्यांनीही घेतला आहे. महिला आयोगाचा सध्या सुरू असलेला सगळा वाद अध्यक्षा रूपाली चाकणकर यांच्याभोवती निगडित आहे.
वैष्णवी हगवणे प्रकरणातील आरोपी रूपाली चाकणकर यांच्याच पक्षाशी निगडित असल्याने हगवणे प्रकरणातील आरोपींवर कारवाई करण्यात त्यांनी चालढकल केली हा त्यांच्यावरचा मुख्य आरोप होता. त्याविषयीच्या आरोपांचा रूपाली चाकणकर यांनी समर्थपणे मुकाबला केल्यानंतर, त्यांच्या विरोधातील आवाज आणखीनच वाढला आणि थेट राज्यपालांकडे याविषयी तक्रारी केल्या गेल्या. रूपाली यांचे व्यक्तिमत्त्व या सगळ्या वादातून झाकोळले जाण्याऐवजी ते जरा उजळूनच निघालेले दिसले असे म्हटले तर वावगे ठरणार नाही.
त्याचे कारण असे की त्यांच्यावर होणाऱ्या प्रत्येक आरोपाला त्या एकट्याच समर्थपणे तोंड देत उभ्या आहेत. आजही महाविकास आघाडीचे शिष्टमंडळ त्यांची हकालपट्टी करा, या मागणीसाठी राज्यपालांना भेटल्यानंतर, पत्रकारांनी पुन्हा रूपालीताईंची प्रतिक्रिया घेतली त्यावेळीही त्यांनी समर्पक उत्तरे दिल्याचे दिसले. 'आयोगाच्या अध्यक्षपदी माझी झालेली निवड ही महाविकास आघाडी सत्तेवर असतानाच्या काळातलीच आहे. त्यामुळे महाविकास आघाडीच्या नेत्यांनीच माझी आधी निवड करायची नंतर माझ्या बदलीची मागणी करायची अशी दुटप्पी भूमिका त्यांनी का घेतली' असा उलट सवाल त्यांनी महाविकास आघाडीलाच विचारला आहे.
विरोधकांना प्रश्न विचारायचा, मागणी करायचा, आणि आक्षेप घ्यायचा अधिकार आहे, असे मुरब्बी विधानही त्यांनी केले आहे. मधल्या काळात रूपाली चाकणकर यांनी विरोधकांना उद्देशून जे एक वाक्य वापरले त्यातून अन्य पक्षाच्या महिला नेत्या चांगल्या चवताळून उठलेल्या दिसल्या. त्यावेळी त्या म्हणाल्या होत्या की, सध्या चिल्लर फारच वाजत असल्याने मला आयोगाच्या कार्यपद्धतीविषयी लोकांपुढे नेमक्या स्वरूपातील माहिती पुन्हा द्यावी लागत आहे. त्यांनी विरोधी आघाडीतल्या महिलांची व नेत्यांची चिल्लर अशी संभावना केल्यानंतर चाकणकर यांच्या विरोधातले वातावरण आणखीनच तापले आहे.
या सगळ्या वादाच्या पार्श्वभूमीवर चाकणकर यांनी प्रत्येक वेळी माध्यमांसमोर प्रत्येक प्रश्नावर आपली बाजू समर्थपणे मांडली आहे. महिला आयोगाकडे येर्णाया प्रकरणांवर आयोग प्रत्यक्ष काय कार्यवाही करतो याची आकडेवारीही त्यांनी तपशीलवार सादर केली आहे. परंतु तरीही त्यांच्या भोवती निर्माण झालेले वादळ अजून शमायला तयार नाही. त्यांच्या बाबतीतला मुख्य आक्षेप असा आहे की, महिला आयोगाचे अध्यक्षपद हे संविधानिक पद असून या पदावर काम करर्णायाकडे राज्यातल्या महिलांवर होर्णाया अन्यायाचे निराकरण करणे ही मुख्य जबाबदारी असते. ही जबाबदारी पार पाडत असताना अध्यक्षांनी आपली राजकीय निष्ठा आड येऊ देता कामा नये.
पण रूपाली चाकणकर यांच्या बाबतीत नेमके हेच घडले असल्यामुळे आता बिगर राजकीय व्यक्ती या आयोगाच्या अध्यक्षपदावर नेमली जावी, ही मागणी जोर धरू लागली आहे. सर्व परिस्थितीचा विचार करता महिला आयोगाचे अध्यक्षपद बिगर राजकीय व्यक्तीकडे राहिले पाहिजे, ही मागणी रास्त वाटते. या व्यक्तीकडे राजकीय, सामाजिक आणि कायदेविषयक जाण असणे महत्त्वाचे आहे आणि मुख्य म्हणजे महिलांच्या प्रश्नासाठी सदर व्यक्तीने यापूर्वीच्या काळात भरीव योगदान दिलेले असणे आवश्यक आहे.
सध्याच्या अध्यक्षा या निकषावर कमी पडतात ही गोष्ट खरी आहे. त्यावर आता राज्यातील सत्ताधारी नेते योग्य तो निर्णय घेतील. त्यांनी तो त्वरित घेतला पाहिजे त्याचे कारण असे की, महिला आयोग ही एक महत्त्वाची यंत्रणा असल्याने ती असल्या नाहक वादात अडकणे कोणाच्याच हिताचे नाही. हा आयोग अन्याय पीडित महिलांसाठी किती तत्परतेने आणि कार्यक्षमतेने काम करतो याकडे सगळ्यांचे लक्ष असते आणि आयोगाचे कामही तेवढ्यापुरतेच मर्यादित असते, किंबहुना तेवढ्यापुरतेच मर्यादित असावे.
पण सध्या या आयोगाच्या अध्यक्षा आणि आयोगाची एकूण कार्यपद्धती याविषयी रोजच जे आक्षेप निर्माण होत आहेत त्यातून आयोगाची सुरू असलेली बदनामी थांबण्याची गरज आहे. हा आयोग प्रशासकीय यंत्रणेवर धाक असणारी यंत्रणा म्हणून काम करतो पण भलत्यासलत्या वादातून आयोगाचीच बदनामी होणार असेल, तर या आयोगाचा पोलीस व अन्य प्रशासकीय यंत्रणेवर धाक राहणार नाही आणि परिणामी महिला आयोगाचे महत्त्व कमी होत जाईल हा धोका अधिक आहे.

# आ. रणजितसिंह मोहिते पाटील यांनी टेंभुर्णी स्टॅन्डची पाहणी केली



**टेंभुर्णी (कटूसत्य वृत्त):-** सोलापूर जिल्ह्याचे विधान परिषदेचे आमदार रणजितसिंह मोहिते पाटील यांच्या फंडातून पंढरपूर तालुक्यातील करकब, माढा तालुक्यातील टेंभुर्णी व करमाळा तालुक्यातील जेऊर प्रत्येकी दोन-दोन कोटी प्रमाणे ६ कोटी मंजूर केले होते. टेंभुर्णी बस स्थानक येथील कामाची पाहणी आमदार रणजितसिंह मोहिते पाटील केली. यावेळी टेंभुर्णीचे माजी सरपंच प्रमोद कुटे, युवा राष्ट्रवादी शरद पवार गटाचे जिल्हाध्यक्ष सुरज देशमुख त्याचबरोबर परिसरातील नेतेमंडळी, ग्रामस्थ, आगारप्रमुख व ठेकेदार इत्यादी उपस्थित होते.

## ५ जुन जागतिक पर्यावरण दिवस

# बदलत्या हवामानामुळे पर्यावरणाची स्थिती ढासळली!



करोना महामारीच्या दुसऱ्या लाटेने "ऑक्सिजनची" परीभाषा काय आहे हे जगाला दाखवून दिले.त्यामुळे सावधान! ऑक्सिजनची पुर्ती करण्यासाठी "पर्यावरणाला" वाचवीने अत्यंत गरजेचे आहे. कारण आज आपण बदलत्या हवामानामुळे पर्यावरणात झालेल्या बदलांचे प्रायचित्य भोगतो आहे. प्रदुषणावरील समस्येवर १९७२ मध्ये संयुक्त राष्ट्र संघाने स्टाकहोम (स्विडन) इथे जगातील पाहीले पर्यावरण सम्मेलन आयोजित केले. यामध्ये ११९ देशांनी भाग घेतला होता व सर्वांनीच पृथ्वीच्या सिध्दांताला मान्यता दिली व दर वर्षी ५ जुन पर्यावरण दिवस म्हणून साजरा करण्याची घोषणा करण्यात आली व ५ जुन १९४७ ला पहीला "जागतिक पर्यावरण दिवस साजरा करण्यात आला". आज संपूर्ण जगात पर्यावरणाच्या बाबतीत असमंजस्यतेचे वातावरण निर्माण झाले आहे. प्रत्येक देश सर्वांनाच सांगतो की पर्यावरण वाचविण्याचा प्रयत्न केला पाहिजे. तरीही जगातील अनेक देश अत्याधुनिक शस्त्रस्पर्धेत आप-आपले शक्ती प्रदर्शन मोठ्या प्रमाणात करतांना दिसतात. यामुळे प्रदूषणात व तापमानात मोठ्या प्रमाणात वाढ होवून पर्यावरणावर विपरीत परिणाम होतांना दिसतो.याचा परिणाम आज तिसऱ्या महायुद्धाकडे जातांना दिसतो.आज युक्रेन - रशिया युद्ध व इजरायल-हमास-ईरान युद्धामुळे अनेक भाग आगीत भस्मसात झाला आहे.त्यामुळे बलाढ्य देशांनीच पर्यावरणाची गळचेपी केल्याचे दिसून येते. अमेरिका,नाटो देश, चीन, उत्तर कोरिया, रशिया, ब्रिटन, इजरायल यांनी पर्यावरणाला कोसो दूर नेवून ठेवले आहे ही समजदार आणि बलाढ्य देशांची शोकांतिकाच म्हणावी लागेल. आपण दुसऱ्या महायुद्धातील हिरोशिमावर टाकलेल्या अणुबॉम्बचे मृत्यूचे तांडव पहाले तरीही प्रत्येक देश पर्यावरणाला बाजूला सारून अणुबॉम्बची भाषा करतात हे जगाचे दुर्भाग्यच म्हणावे लागेल. परंतु आज अक्षरशः युक्रेनने १ जुन २०२५ ला रशियाचे ५ एअर बेस उध्वस्त केले व रशियावर पर्ल हार्बर सारखा अट्याक करून रशियाला तिसऱ्या महायुद्धासाठी उकसविल्याचे दिसून येते.कारण आज प्रत्येक देश निसर्गाच्या हिरव्यागार गालीच्यावर बसण्यापेक्षा बारूदच्या ढीगाऱ्यावर बसण्याचे जास्त पसंत करतांना दिसतो.कारण अत्याधुनिक शस्त्र स्पर्धेत सर्वच अव्वल येण्यासाठी प्रत्येक देश कसोटीचे प्रयत्न करीत आहे. त्यामुळे पुढे चालून बारूदचा ढीगारा संपूर्ण पृथ्वीला आगीच्या खाईत लोटु शकते.त्यामुळे सावधान जगातील देशांनो बारूदच्या ढीगाऱ्यावर लक्ष न देता पर्यावरणावर लक्ष दिले पाहिजे.कारण वाढत्या तापमानामुळे मे २०२४ ला भारताची राजधानी दिल्ली येथील तापमान सर्वाधिक ५२.३ अंश सेल्सिअस होते यावरुन आपण समजू शकतो की पुढे तापमानात मोठ्या प्रमाणात वाढ होवू शकते याला नाकारता येत नाही. आज जगात मोठ्या प्रमाणात शहरीकरण, औद्योगिकीकरण व सिमेंट रोडचा विस्तार झाल्यामुळे पर्यावरण डगमगतांना दीसत आहे. ढासळत्या पर्यावरणामुळे सुर्य आग ओकत आहे.२०१९ मध्ये राजस्थान मधील चुर आणि श्रीगंगानगर येथे तापमान ५० डीग्री सेल्सिअस पार गेल्याने भारतातील पर्यावरण रेड झोनमध्ये होते ही अत्यंत चिंतेची व गंभीर बाब आहे. २६ मे २०२० ला इराकमधील तूज या शहरात जगभरातील उच्चांकी ५०.५ अंश सेल्सिअस होते. भारतात मे २०२४ मध्ये दिल्लीतील तापमान ५२.३ अंश सेल्सिअस वर गेले होते.यामुळे वाढते तापमान पृथ्वीसाठी, मानव, जीवजंतू, पशुपक्षी या सर्वांसाठी आगीचा गोळा बनल्याचे दिसून येते. वाढता तापमानातील बदल हा मानवाच्या अतीरेकामुळे व अहंकारामुळे निर्माण होत आहे.याचा सरळ परिणाम पर्यावरणावर होत असुन त्याचा ह्रास होत आहे. २०१९ मध्ये बंगालमध्ये आलेल्या "अम्फान" चक्रीवादळाने १०० हुन अधिक लोकांचा बळी गेला व मोठ्या प्रमाणात वित्तीय हानी सुध्दा झाली. यानंतर "तौक्ते व "यास" चक्रीवादळाने हाहाःकार माजवीला.म्हणेज दरवर्षी दिवसेंदिवस वेगवेगळे चक्रीवादळ उग्ररूप धारण करतांना दिसते. मानवाने पर्यावरणाकडे दुर्लक्ष केल्यामुळे ह्या संपूर्ण विनाशकारी नवीन-नवीन घटना पहायला मिळतात.याकरीता मानवाने पर्यावरणाची जोपासना करण्याची गरज आहे.आज जगात मोठ्या प्रमाणात प्रदुषण वाढत आहे. त्यामुळे पृथ्वीतलावरील ऑक्सिजनची मात्रा दीवसेंदीवस कमी होतांना दिसत आहे. याचे उदाहरण आपणाला करोना काळात चांगल्याप्रकारे ग्यात आहे.यामुळे अनेक प्रकारचे नवीन-नवीन आजार उदयास येताना दीसतात. आज पर्यावरणाचे संतुलन विस्कळीत झाल्यामुळे व मोठ्या प्रमाणात जंगलतोड झाल्यामुळे जंगलातील हिंसक पशु शहरांकडे शिरकाव करतांना दिसतात. यामुळे मानवीय हानी मोठ्या प्रमाणात होतांना आपण पहातो. यामुळेच मानव व पशु यांच्यात शत्रृत्वाची भावना निर्माण झाली आहे. आज प्रदुषणामुळे अनेक पशु-पक्षी लुप्त झाल्याचे दिसून येते."गिधाड हा पक्षी" पर्यावरणाच्या दृष्टीकोनातून एक महत्त्वाचा घटक आहे.परंतु प्रदुषणामुळे गिधाडांची संख्या कमी झाल्याचे दिसून येते. अशा प्रकारे अनेक पशु-पक्षांना प्रदुषणामुळे आपले प्राणसुध्दा गमवावे लागतात. पर्यावरणाला वाढविण्याकरिता मोठ्या प्रमाणात वृक्षारोपण करण्याची गरज आहे.वाढते शहरीकरण व औद्योगिकीकरण यांना कुठेतरी अंकुश लावला पाहिजे आणि मोठ्या प्रमाणात वृक्षलागवड व्हायला पाहिजे. आज प्रदुषणामुळे व ग्लोबल वॉर्मिगमुळे मोठ्या प्रमाणात ग्लेशिअर वितळत आहे, समुद्राच्या पाण्याची पातळी दीवसें-दीवस वाढतच आहे, शहरीकरण, औद्योगिकीकरण व खनण प्रक्रियेमुळे जमीनिचा भुभाग निकामी होत आहे. यामुळे जगात ज्वालामुखीचा उद्रेक, वनवा लागुन जंगल संपदा नष्ट होने, भुकंप, सुनामी, अम्फान तुफान, अती पाउस,अती उष्णता, अती थंडी, अवकाळी पाऊस, विजापडुन मृत्यूचे प्रमाण सुध्दा मोठ्या प्रमाणात वाढले आहे. या घटना आपल्याला निरंतर पहायला मिळतात. त्यामुळे आज जगातील देशांचे व देशातील प्रत्येक व्यक्तीचे कर्तव्य आहे की पर्यावरणाला वाचविण्यासाठी मोठ्या प्रमाणात वृक्षारोपण करून "घर तिथे झाड" ही मोहीम राबविली पाहिजे. जंगल तोडीमुळे पावसाचे पाणी जमिनीत न मुरता सरळ समुद्रात किंवा नद्यांमध्ये जातांना आपण पहातो. यामुळे विहीरीच्या पाण्याची पातळी दीवसें-दीवस कमी होतांना दिसते. याकरीता ७०० फुट बोअरवेल खोदुन मानव पाण्याची तहान भागवत आहे. पाण्यासाठी ७०० फुटांवर मानवाने जाने म्हनजे देवलोकातील (पाताळातील) पाणी आनल्या सारखे आहे.मानवाचा अधिकार फक्त ५० ते १०० फुटांपर्यंतच आहे.परंतु मानवाने आपल्या बुद्धीचा अतीरेक केला त्यामुळेच आज मानवावर निसर्ग कोपत आहे ही सत्य परिस्थिती आहे. यावरून स्पष्ट होते की मानवजाती स्वतःच्या स्वाथार्साठी कोणत्याही स्तरावर जायला मागेपुढे पाहत नाही. कोव्हीड-१९ची महामारी मानवाच्या अतीरेकामुळेच झालेली होती.एप्रिल-मे महीना उष्णतेच्या लाटेचा होता त्यामुळे "संपूर्ण भारतात उष्णतेची लाट आणि पाण्याचा हा!हा!कार!" पहायला मिळाला. तळपत्या सुर्याने संपूर्ण भारतात उष्णतेची लाट पसरली.पशु-पक्षी पाण्यासाठी वणवण भटकतांना दीसतात.हा संपूर्ण प्रकार पर्यावरणाचे संतुलन डगमल्याचा आहे.त्यामुळे निसर्गाला वाचविने काळाची गरज आहे. निसर्ग वाचला तर पृथ्वी वाचेल, पृथ्वी सुरक्षीत रहाली तर मानवजाती, पशु-पक्षी, जिवसृष्टी, जिवजंतु सुरक्षित राहील.परंतु याकरिता सर्वांनीच पर्यावरणाची काळजी घेणे अत्यंत गरजेचे आहे. पर्यावरण वाचविण्यासाठी जल,वायु,भुमि यांची जोपासना करणे गरजेचे आहे.संपुर्ण जगात जल व वायू प्रदूषण मोठ्या प्रमाणात दीसुन येते.पर्यावरण टीकुन रहावे याकरिता प्रत्येक देश पर्यावरणावर करोडो रुपये खर्च करतात. परंतु कोव्हीड-१९ च्या महामारीच्या काळात जगात लॉकडाउन होता यामुळे हवाई वाहातुक,रेल्वे, कारखाने व इतर संपूर्ण वाहातुक बंद होती. यामुळेच करोनाकाळात पर्यावरण अत्यंत आल्हाददायक होते.नद्यांना प्रदुषनापासुन मुक्त करण्यासाठी सरकारने करोडो रुपये खर्च केले.परंतु लॉकडाउनच्या काळात नदी, नाले, तलाव आपोआप प्रदुषण मुक्त झाले व पृथ्वी वरील निसर्ग बहरला आणि पर्यावरणात आपोआप सुधारणा झाली.५ जुन जागतिक पर्यावरण दिनानिमित्त मी सरकारला आव्हान करतो की लॉकडाउनच्या काळातील प्रदुषणाची मुक्ती पहाता "दर महिन्याला एक दिवस लॉकडाउन ठेवायला पाहिजे" असे माझे स्पष्ट मत आहे.वाढती लोकसंख्या,वाढते औद्योगिकीकरण पृथ्वीला व पर्यावरणाला घातक आहेच यात दुमत नाही.परंतु यातुन मार्ग आपल्यालाच काढावाच लागेल. याकरीता शहरीकरणाचा व औद्योगिकीकरणाचा विस्तार रोखायला पाहिजे आणि मोठ्या प्रमाणात वृक्षारोपण करून व महीण्यातुन "एक दिवस" लॉकडाउन ठेवण्याचा "संकल्प" भारतासह संपूर्ण जगाने घ्यायला हवा.आज संपूर्ण जग बारूदच्या ढीगाऱ्यावर बसलेले आहे हे विनाशाचे संकेत आहे. यापासुन जगातील संपूर्ण देशांनी शस्त्रसंधी करून दारूगोळ्यामध्ये कपात करायला पाहिजे.यामुळे पर्यावरण वाचविण्यासाठी मोठी मदत होईल. अन्यथा "विनाशकारी विपरीत बुद्धी" असा प्रकार व्हायला वेळ लागणार नाही. याकरीता पर्यावरण वाचविण्याचा संदेश संपूर्ण जगात जायला पाहिजे. पर्यावरण वाचविण्या करिता "शक्तीचा" वापर न करता "भक्तीचा व युक्तिचा" वापर जास्त केला तरच "निसर्ग" भरभराटीला येईल. पृथ्वीतलावरील ऑक्सीजनची कमी पहाता प्रत्येकाने आपल्या घरी तुळशी, मनीप्लांट, जुही, एलोवेरा इत्यादी वृक्ष अवश्य लावले पाहिजे. त्याचप्रमाणे ग्राउंडच्या ठिकाणी किंवा उद्यानाच्या ठिकाणी वडाचे झाड, पीपळ, नीम, आंबा इत्यादी झाडांची लागवड करून ऑक्सिजनची मात्रा वाढवीली पाहिजे व पर्यावरणाला वाचवीले पाहिजे."झाडे लावा,झाडे जगवा व पर्यावरण वाचवा"



**रमेश कृष्णराव लांजेवार**
(स्वतंत्र पत्रकार)
मो.नं.९९२१६९०७७९, नागपूर.

## प्रबोधन

# स्वर्गलाभ खोटा । आणि काल्पनिक

काशी जावे, नित्य बदावे अशी एक प्रसिद्ध लोकोक्ती आहे. काशीला जाण्याचा संकल्प केला तरी पुण्य मिळतं, असा हा जुनाट श्रद्धेचा प्रकार आहे. भारतभ्रमण करीत दहा-बारा वर्षांनी काशीला पोचायचं. गंगेच्या काठी झोपडी बांधून सर्वसंगपरित्याग करून राहायचं, या प्रकारच्या जगण्याला गंगावास असा शब्द होता. ह्या झोपडीत मरेपर्यंत राहून मृत्यूसमयी देह गंगेला अर्पण करून शेवट गाठायचा. काशीचं हे माहात्म्य संतश्रेष्ठ तुकोबाही मानतात, भीमातीरवासी। तेथे निश्चयेसी काशी- काशी आणि पंढरपूर यात फरक नाही, असं तुकोबांनी म्हटलं आहे. पण पुढे एका अभंगात काशीयात्रा पाच, द्वारकेच्या तीन। पंढरीची जाण एक यात्रा ।। असं एक गणित मांडून त्यांनी काशीयात्रेचं माहात्म्य वीस टक्क्यांवर आणून बरंच अवमूल्यन केलं आहे.
आधुनिक संत गाडगेबाबा नेहमी तीर्थयात्रेकरूंना दोष द्यायचे. थोर बुद्धिवादी संत कबीरांचा वारसा त्यांनी चालू ठेवला. तीथी धोंडा पाणी असं तुकाराम महाराज म्हणाले. त्यापुढे जाऊन गाडगेबाबा म्हणाले जत्रा में फत्तरा बिठाया। तीरथ बनाया पानी। दुनिया भई दिवानी। पैसे की धुळधाणी ॥ काशी, गया,प्रयाग, त्रिवेणी। तेथे धोंडा पाषाण पाणी।। गाडगेबाबा काशीसारख्या तीर्थक्षेत्रांना किंमत देत नव्हते.
काशीक्षेत्राविषयी जनहितार्थ एक लोकोक्ती जुन्या काळापासून प्रचलित आहे. तिने तर दुसऱ्या अंगाने कहर केला आहे. लोकोक्ती म्हणते, रांड, सांड, सिढी, संन्याशी। इनसे बचे तो सेवे काशी। यात पंड्यांचा समावेश करावयाचा राहिला आहे. या ब्राह्मण- पंड्यांच्या तावडीतून जो बचावतो, त्याचीच काशीयात्रा सफळ झाली, असं म्हटलं जातं. ही मंडळी नानाप्रकारे भाविकांचं शोषण करतात.
अजागळ धार्मिकांनी तोंडाला फेस येईपर्यंत काशीयात्रेचं माहात्म्य आजवर गायिलं, तरी आज गंगेसारखीच काशीही प्रदूषित झाली आहे. काशीचं हे प्रदूषण सामाजिक आहे. एका अभ्यास गटाने केलेल्या नोंदी आपणाला धोक्याचा इशारा देणाऱ्या आहेत. हा अभ्यासगट लिहितो, 'संध्याकाळी घाटावरच्या कार्यक्रमांना खऱ्या अर्थाने सुरुवात होते. इथल्या छोट्या दुकानदारांकडे विदेशी पर्यटक गर्दी करतात. कारण हेच दुकानदार त्यांना अफू, गांजा, चरस पुरवतात. जवळच गाझीपूरला अफूची मोठ्या प्रमाणात शेती होते. त्यामुळे अफूची कमतरता येथे कधीही जाणवत नाही. अमली पदार्थ विकणाऱ्यांचे जसे येथे रॅकेट आहे. तसेच विदेशी पर्यटकांना बायका पुरवणाऱ्यांचंही येथे मोठं जाळं आहे. अलीकडे चाइल्ड सेक्स हा प्रकारही येथे बोकाळला आहे.'
'इथल्या मल्ला जातीतील गाईडच्या प्रेमात पडून त्यांच्याशी लग्न करणाऱ्या विदेशी महिला पर्यटक तसेच विदेशी पुरुष पर्यटकांची सहा-सहा महिने सोबत करणाऱ्या स्थानिक महिलांची संख्याही मोठी आहे... परदेशी पर्यटकांना सोबत करण्यासाठी इथे बायका सहज उपलब्ध होतात. गेल्या १५-२० वर्षांत काशीच्या गुन्हेगारीत वाढ झाली असून शहरात चित्रपटगृहात इंटरव्हलनंतर सर्रास ब्ल्यू फिल्म्स दाखवतात... येथील २० ते २५ वयोगटातील तरुणांनी लग्नाआधीच शरीरसुखाचा अनुभव घेतलेला असतो."
काशीत हे गलिच्छ प्रकार पूर्वीपासून सुरू आहेत. काळानुरूप त्यांच्या पद्धतीत तेवढा बदल झाला आहे. शहाण्या लोकांनी गंगेचा नाद सोडला आहे. छत्रपती शाहू महाराजांनी केलेल्या भारतभ्रमणाच्या वेळची गोष्ट आहे. शाहूराजे तेव्हा १७-१८ वर्षांचे होते. पंड्यांनी लाख आग्रह केले, पण कुंडाच्या कुजक्या, नासक्या पाण्याचं निरीक्षण करून महाराजांनी कुंडात स्नान करायला साफ नकार दिला. काशीयात्रेला त्यांनी शून्य मार्क्स दिले होते. आता अभ्यासगटाने काशीची 'अंदर की बात' खुली केली आहे. तेव्हा भाविकांनी काशीला दूरूनच नमस्कार करणे श्रेयस्कर आहे, कारण-
पुराणे गाताती। काशीचा महिमा

शोषणाला सीमा नाही तेथे ॥१
कोळी लावी जाळे पकडे कीटक
क्षेत्रे ही घातक। तशी भक्ता ॥ २
गांजा, वेश्या, साधू वळू मस्तवाल
यात्रिकांचे हाल यांनी केले ॥३
चोर पंडे खेळ श्रद्धेशी खेळती
भक्ता नागविती । लबाडीने ॥४
काशीमध्ये नीती औषधा मिळेना
गंगेमध्ये नाना। विषजंतू ॥५
नासक्या पाण्यात कुजलेली प्रेते
मलमूत्रा तेथे मिती नाही ॥ ६
तीर्थ तेच पिती। आंधळे भाविक
दुर्धर अनेक रोग होती ॥७
भगीरथ यत्न करूनीही आता
शुद्धतेची वार्ता । शक्य नाही ॥ ८
स्वर्गलाभ खोटा आणि काल्पनिक
काशीत नरक नक्की मिळे ॥९



**प्रा. डॉ. जे. बी. शिंदे**
844/1, साळोखेनगर,
कळंबा रोड, कोल्हापूर-416012
92258 09071

# शाळा-महाविद्यालयातच मिळणार 'लालपरी'चे पास

## मुलींना १०० टक्के तर मुलांना ६६ टक्के सवलत

**सोलापूर (कटूसत्य वृत्त):-** यंदाच्या शैक्षणिक वर्षाची सुरवात १६ जूनपासून होणार आहे. या पार्श्वभूमीवर महाराष्ट्र राज्य परिवहन महामंडळाच्या अधिकाऱ्यांनी विद्यार्थ्यांना शाळा-महाविद्यालयांमध्येच मोफत प्रवास व सवलतीच्या पासचे वाटप करण्याचा निर्णय घेतला आहे. शाळांमध्ये परगावाहून येणाऱ्या विद्यार्थ्यांची यादी व त्यांचे बोनाफाईड मुख्यापकांनी दिल्यास त्या शाळांमधील विद्यार्थ्यांना 'लालपरी'च्या प्रवासाचे पास मिळणार आहेत. सोलापूर जिल्ह्यात एसटीच्या बसगाड्यांमधून दरवर्षी सरासरी १५ लाख मुले-मुली मोफत पासद्वारे प्रवास करतात. मुलींसाठी १०० टक्के सवलत असून मुलांना तिकीट दराच्या ३४ टक्के शुल्क भरल्यास त्यांना देखील सवलतीचा पास मिळतो.

एसटी महामंडळाच्या बसमधून सध्या ६० वर्षांवरील ज्येष्ठांना ५० टक्के तर ७५ वर्षांवरील वृद्धांना मोफत प्रवास आहे. तर लाडक्या बहिणींना ५० टक्के सवलत आहे. याच पद्धतीने शाळा-महाविद्यालयातील मुलींसाठी देखील मोफत प्रवासाची योजना लागू आहे.

मुला-मुलींना द्यावे लागणार बोनाफाईड एलकेजी, युकेजी, प्राथमिक, माध्यमिक शाळा, कनिष्ठ महाविद्यालय व उच्च महाविद्यालयांमध्ये शिक्षण घेणाऱ्या मुलींसाठी महाराष्ट्र राज्य परिवहन महामंडळाची मोफत पासची योजना सुरू आहे. मुलींसाठी पुण्यश्लोक अहिल्यादेवी होळकर मोफत बस पास योजना आहे.

योजनेतून मोफत पास काढण्यासाठी मुलींना किंवा मुलांना त्या शाळा-महाविद्यालयाचे बोनाफाईड व एक छायाचित्र द्यावे लागणार आहे. मुख्याध्यापक किंवा प्राचार्यांना त्यांच्या शाळा-महाविद्यालयातील विद्यार्थी -विद्यार्थिनींना मोफत बस पास द्यायचे असल्यास त्यांनी तसे पत्र महामंडळाच्या आगारप्रमुखांना द्यायचे आहे. त्यानुसार त्यांना त्यांच्या शाळेत पास उपलब्ध करून दिले जाणार आहेत.

पान १ वरून

# म्हैसाळच्या लाभ क्षेत्रातील...

तलाव म्हैसाळ योजनेअंतर्गत टॅंक फिडिंग बंदिस्त नलिकेद्वारे भरण्याच्या प्रस्तावास मंजूर देवून त्याकरीता निधी उपलब्ध करून देण्यात यावे.

म्हैसाळ योजनेअंतर्गत सोलापूर जिल्ह्यातील मंगळवेढा तालुक्यातील गावांच्या सिंचनासाठी असलेल्या मंगळवेढा वितरीका क्रमांक 2 वरून मौजे महमदाबाद, शिरनांदगी, मारोळी, चिखलगी, जंगलगी, सलगरे (बु.), सलगरे (खुर्द), बावची व पौट या 9 गावांच्या सिंचनासाठी पाणी पुरवठा करण्यात येतो. परंतू या मंगळवेढा वितरीका क्रमांक 2 वरील स्टेज 5 पंप हाऊसमधील विद्युत पंपाची पाणी उपसण्याची क्षमता कमी झालेली आहे. त्यामुळे या 9 गावांसाठी पुरेश्या क्षमतेने पाण्याचा विसर्ग होत नाही. त्याचा परिणाम या गावातील सिंचन क्षेत्रावर झालेला आहे. त्यामुळे मंगळवेढा वितरीका क्रमांक 2 वरील स्टेज 5 पंप हाऊसमधील विद्युत पंपाची तात्काळ दुरुस्ती होणे गरजेचे असल्याबाबत या गावातील ग्रामस्थांनी खासदार प्रणिती शिंदे यांना निवेदन दिलेले होते. याकरीता म्हैसाळ योजनेअंतर्गत सोलापूर जिल्ह्यातील मंगळवेढा तालुक्यातील गावांच्या सिंचनासाठी असलेल्या मंगळवेढा वितरीका क्रमांक 2 वरील स्टेज 5 पंप हाऊसमधील विद्युत पंपाची तात्काळ दुरुस्ती करण्यात यावी.

सोलापूर जिल्ह्यातील मंगळवेढा तालुक्यातील मौजे मानेवाडी या गावातील तलाव पूर्ण क्षमतेने भरत नाही. यामुळे यामुळे शेतकऱ्यांना, जनावरांना व पिकांकरीता पाण्याची अडचणी निर्माण होत आहे. या गावाच्या आसपासचे हुन्नूर, ममदाबाद, रेवेवाडी या गावांचा समावेश म्हैसाळ योजनेअंतर्गत करण्यात आलेला आहे. याकरीता म्हैशाळ योजनेअंतर्गत मौजे मानेवाडी या गावाचा समावेश करण्यात यावा.

सोलापूर जिल्ह्यातील मंगळवेढा तालुक्यातील मौजे शिरशी या गावांमध्ये पाण्याची पुरेशी क्षमता नसल्यामुळे शेतकऱ्यांना, जनावरांना व पिकांकरीता पाण्याची अडचणी निर्माण होत आहे. मौजे शिरशी हे गाव मंगळवेढा मधील दुष्काळी पट्ट्यातील असून मंगळवेढा उपसा सिंचन योजनेच्या कार्यक्षेत्रात येत असून त्याच्या आसपासची लक्ष्मीदहिवडी, आंधळगाव, लेंडवे चिंचाळे व गोणेवाडी ही गावे उपसा सिंचन योजनेमध्ये समाविष्ट असून शिरसी या गावाचे सदर योजनेमध्ये समाविष्ट होणे आवश्यक आहे. यासाठी मौजे शिरसी या गावाचे मंगळवेढा उपसा सिंचन योजनेमध्ये समावेश करण्यात यावा

हाल होत असल्याने सदरच्या प्रस्तावास तात्काळ मंजूरी मिळण्याकरीता ग्रामस्थांनी खासदार प्रणिती शिंदे यांना निवेदन दिलेले आहे. याकरीता म्हैसाळ मुख्य वित्रीकेपासून मौजे सलगर येथील लक्ष्मी तलाव व लवंगी येथील तलाव भरण्यासाठी प्रस्ताव मंजूर असून सदर प्रस्ताव निधीच्या अभावी शासन स्तरावर रखडलेला असल्याने सदरच्या प्रस्तावास तात्काळ मंजूरी मिळावी. इ. विषयांच्या समस्यांबाबत खासदार प्रणिती शिंदे यांनी जलसंपदा मंत्री राधाकृष्ण विखे-पाटील यांच्याकडे शिष्टमंडळासमेवत भेट घेवून वरील समस्यांचे निवारण होण्याकरीता निवेदनाव्दारे मागणी केली.

## वात्रटिका

### कारण हागवणे

काही लोकांना माणुसकी
स्वस्ती वाटू लागली...
तशी मुली आणि बाप्पांना
धास्ती वाटू लागली...
चुक कोणाची अन ती
कोणाला नडली....
हागवण झाली कोणाची
आणि लग्नाळूची चिंता वाढली...

**हणमंत पडवळ,**
धाराशिव,
**8698067566**

हे दैनिक मालक-प्रकाशक, मुद्रक, संपादकः श्री पांडूरंग हरिदास सुरवसे यांनी संस्कृती प्रिंटींग प्रेस, एफ-3, वृंदावन पार्क, होटगी रोड, सोलापूर - 413003 येथे छापून येथूनच प्रसिद्ध केले. कार्यालयः एफ - 3, वृंदावन पार्क, होटगी रोड, सोलापूर - 413003
फोन/फॅक्स +91 217 355 0592 RNI No . MAHMAR 2006/17624 संपादकः पांडूरंग हरिदास सुरवसे, मो. (9765390339) उपसंपादकः सचिन मोहन जाधव, मो. (9657069069) कायदा सल्लागारः ॲड खतीब वकील.
Owner, Publisher, Printer and Editor Pandurang Haridas Survase Printing at Sanskruti Printing Press F-3 Vrundavan Park, Hotagi Road, Solapur 413003. (Maharashtra) Published from Office F-3 Vrundavan Park, Hotagi Road, Solapur 413003.(Maharashtra) Phone- +91 217 355 0592 Editor Pandurang Survase-9765390339, Deputy Editor Sachin Jadhav-9657069069. **RNI No. MAHMAR 2006/17624**

# शिवराज्याभिषेक सोहळ्यास मोहोळ तालुक्यातून हजारो शिवभक्त जाणार

**नरखेड (कटुसत्य वृत्त):-** युवराज छत्रपती संभाजी महाराज यांच्या मार्गदर्शनाखाली अखिल भारतीय शिवराज्याभिषेक सोहळा महोत्सव समितीच्यावतीने किल्ले रायगडावर ५ व ६ जून रोजी आयोजित करण्यात आलेल्या 'शिवराज्याभिषेक सोहळा जागर शौर्यभक्तीचा' या उत्सवाला मोहोळ शहर व तालुक्यातून हजारो शिवभक्त जाणार असल्याची माहिती शिवराज्याभिषेक सोहळा समितीचे शुभम ढवण यांनी दिली.

किल्ले रायगड येथे प्रत्येक वर्षाप्रमाणेच यावर्षी पाच व सहा जून रोजी मोठ्या उत्साहात शिवराज्याभिषेक सोहळा होणार आहे. ५ जून रोजी दुपारी राजमाता जिजाऊ यांच्या समाधीला अभिवादन करून शिवराज्याभिषेक सोहळ्याला सुरुवात होणार आहे. त्यानंतर



युवराज छत्रपती संभाजी महाराज व युवराज कुमार शहाजीराजे छत्रपती यांचे किल्ले रायगड येथे भव्य स्वागत व शिवभक्तांच्या समवेत पायी गड चढण्यास प्रारंभ होणार आहे. त्यानंतर नगरखाना येथे गड पूजन होणार असून त्यानंतर

संयोगिता राजे छत्रपती महाराजांच्या हस्ते 'धार तलवारीची युद्ध कला महाराष्ट्राची' या युद्ध कलेच्या प्रात्यक्षिकाला प्रारंभ होणार आहे. दि. ६ जून रोजी रायगडावर युवराज कुमार शहाजीराजे छत्रपती यांच्या हस्ते पारंपारिक वाद्याच्या गजरात ध्वज पूजन व ध्वजारोहण कार्यक्रम होईल. त्यानंतर छत्रपती शिवाजी महाराजांच्या पालखीचे राज सदरेवर आगमन, सिंहासनारुड मूतीर्ला सुवर्णमुद्रांचा अभिषेक केला जाणार आहे.

तरी शिवभक्तांनी रायगडावर मोठ्या संख्येने उपस्थित राहावे, असे आवाहन शिवराज्याभिषेक महोत्सव समितीच्या मोहोळ शाखेच्या वतीने करण्यात आले आहे. यावेळी समर्थ काळे, विजयराज करंडे, देविदास भोसले, रामभाऊ गुंड, बबलू पासले, गोपाळ देशमुख, श्रीकांत ढवण, विजय रणपिसे, अमोल करंडे, ब्रह्मदेव करंडे, रोहन देशमुख, नितीन वाघमारे यांच्यासह आदी उपस्थित होते.

# कायद्याच्या चौकटीत सण साजरा करा : आयुक्त

**सोलापूर (कटुसत्य वृत्त):-** कायद्याच्या चौकटीत राहूनच प्रत्येकांनी सण उत्सव साजरा केला पाहिजे, असे मत पोलिस आयुक्त एम. राजकुमार यांनी व्यक्त केले.

बकरी ईद सणाच्या पार्श्वभूमीवर पोलिस आयुक्तालयात आयोजित शांतता बैठकीत बोलत होते. यावेळी पोलिस अधिकारी, शांतता समितीचे सदस्य, महापालिकेचे अधिकारी, शहर काझी, मुस्लिम धर्मगुरू, प्रमुख मस्जिदचे



विश्वस्त, प्रमुख ईदगाह मैदानाचे विश्वस्त यावेळी उपस्थित होते.

यावेळी आयुक्त एम. राजकुमार यांच्यासह अजित बोऱ्हाडे, पोलिस उपायुक्त डॉ. दीपाली काळे, पोलिस उपायुक्त विजय कबाडे, पोलिस उपायुक्त प्रताप पोमण, सहाय्यक पोलिस आयुक्त यशवंत गवारी, सुधीर खिरडकर, राजन माने, पालिकेचे किशोर सातपुते, महावितरणचे अति कार्यकारी अभियंता प्रदीप मोरे, व जिल्हा पशुसंवर्धन उपायुक्त विशाल येवलेसह सर्व पोलिस ठाणेतील प्रभारी अधिकारी व पोलिस अंमलदार, व शांतता कमिटीचे सदस्यांची उपस्थिती होती.

आयुक्त राजकुमार म्हणाले की, बकरी ईदच्या पार्श्वभूमीवर कोणीही व कोणत्याही प्रकारचे गोवंशीय प्राण्यांची अवैधपणे वाहतूक करू नये, याची नोंद घ्यावी. बकरीच्या कुबार्नीनंतर सार्वजनिक ठिकाणी, रस्त्यावर, उघड्यावर कोणतीही घाण, रक्त किंवा मांस पडणार नाही याची काळजी प्रत्येकांनी घ्यावी. स्वच्छतेचे पालन करत रोगराई, दुर्गंधी पसरणार नाही याची दक्षता घ्यावी. कायद्याचे उल्लंघन करू नये. प्रारंभी उपायुक्त डॉ. दीपाली काळे यांनी प्रास्ताविक केले.

# प्रवेश नोंदणीसाठी पुन्हा तांत्रिक अडचणी

**सोलापूर (कटुसत्य वृत्त):-** अकरावी प्रवेशासाठी दोन दिवसांची मुदतवाढ मिळाली आहे. मात्र, ऑनलाईन प्रवेश नोंदणी करता पुन्हा तांत्रिक अडचणी येत असल्याने विद्यार्थ्यांतून संताप व्यक्त केला जात आहे.

प्रवेश नोंदणी करण्यासाठी ऑनलाईन केंद्रावर गेल्यावर प्रवेशाची संकेतस्थळ ओपन न होणे, ओपन झाल्यास संथगतीने चालणे, चलन भरण्यास अर्धा तास लागले, अचानक सर्व्हर डाऊन होणे, अशा अनेक अडचणी येत असल्याने बऱ्याच विद्यार्थ्यांची नोंदणी मंगळवारी झाली नाही. त्यामुळे ते विद्यार्थी पुन्हा बुधवारी ऑनलाईन नोंदणी करणार आहेत.

दरम्यान, सोमवार, दि. २६ मे पासून अकरावी प्रवेश प्रक्रिया सुरू झाली आहे. मंगळवारी दि.३..जूनला प्रवेशाची मुदत संपणार होती. मात्र, राज्यातील लाखो विद्यार्थ्यांची नोंदणी बाकी असल्याने गुरुवार दि. ५ पर्यंत मुदतवाढ दिली आहे. प्रवेशासाठी दोन दिवसच शिल्लक राहिल्याने विद्यार्थी अर्ज नोंदणीसाठी विविध महा-ई-सेवा केंद्रावर गर्दी केल्याचे चित्र जिल्ह्यात दिसत आहे.

**दोन दिवसांत करावे लागणार अर्ज**

अकरावी प्रवेशासाठी विद्यार्थ्यांची ऑनलाईन नोंदणी सुरू आहेत. जिल्ह्यात ५९ हजारांपेक्षा जास्त विद्यार्थी दहावीची परीक्षा उत्तीर्ण झाले आहेत. त्यातील जवळपास ४० हजार विद्यार्थ्यांने ऑनलाईन नोंदणी केली आहे. उर्वरित १९ हजार विद्यार्थ्यांना दोन दिवसात ऑनलाईन नोंदणी करावी लागणार आहे, अन्यथा त्यांना अकरावीसाठी प्रवेश मिळणार नाही.

# शिवाजी तळेकर हे उत्तम प्रशासक व विद्यार्थीप्रिय मुख्याध्यापक- राजेंद्र गुंड



**माढा (कटूसत्य वृत्त):-** शिवाजी तळेकर हे एक उत्तम प्रशासक व विद्यार्थीप्रिय मुख्याध्यापक म्हणून अविरतपणे कार्यरत राहिले. सर्व शिक्षक व शिक्षकेतर कर्मचाऱ्यांना त्यांनी विश्वासात घेऊन सर्वसमावेशक पद्धतीने शाळेचे कामकाज उत्कृष्ट पद्धतीने केले. त्यांनी गणित व भूमिती हे विषय अत्यंत सहजसोप्या पद्धतीने विद्यार्थ्यांना शिकविले. त्यांनी शाळेच्या निकालाची उज्वल परंपरा राखण्यात सदोदित यश मिळविले. ते एक आदर्श पालक व कुटुंबप्रमुख आहेत त्यामुळेच त्यांनी त्यांच्या एका मुलाला शिक्षक व एका मुलाला डॉक्टर करण्यासाठी उच्च शिक्षण दिले आहे.याकामी त्यांना त्यांच्या सुविद्य पत्नी जलवंती तळेकर यांची बहुमोल साथ लाभली आहे.त्यांचे उर्वरित आयुष्य निरोगी राहून त्यांच्या हातून समाजकार्य घडो अशी अपेक्षा विठ्ठलवाडीचे आदर्श शिक्षक राजेंद्र गुंड यांनी व्यक्त केली आहे.

ते देवडी ता.मोहोळ येथील महात्मा गांधी विद्यालयाचे गणित विषयाचे शिक्षक तथा उत्तम प्रशासक आदर्श मुख्याध्यापक शिवाजी नारायण तळेकर हे 37 वर्षाच्या प्रदीर्घ सेवेनंतर निवृत्त झाल्याबद्दल आयोजित सत्कार समारंभात बोलत होते.

यावेळी सेवानिवृत्त मुख्याध्यापक शिवाजी तळेकर व त्यांच्या सुविद्य पत्नी जलवंती तळेकर यांचा सत्कार विठ्ठलवाडीचे सेवानिवृत्त आदर्श मुख्याध्यापक बाळू गुंड व शांताबाई गुंड यांच्यासह विविध क्षेत्रातील मान्यवर व आजी-माजी विद्यार्थ्यांच्या हस्ते करण्यात आला. सन -1995 च्या दहावीच्या विद्यार्थ्यांनी शिवाजी तळेकर यांना 37 ग्रंथ व पुस्तके भेट म्हणून दिली.

यावेळी प्राथमिक शिक्षक रविकांत पेठे व सहशिक्षिका माधुरी गुंड, डॉ.ओंकार थोरात यांनीही सेवानिवृत्त मुख्याध्यापक शिवाजी तळेकर यांच्याविषयी मनोगत व्यक्त करताना त्यांच्या शैक्षणिक व कौटुंबिक कायार्चे कौतुक केले.

सत्काराला उत्तर देताना सेवानिवृत्त मुख्याध्यापक शिवाजी तळेकर यांनी सांगितले की, सेवानिवृत्त झाल्याबद्दल जो नातेवाईक, ग्रामस्थ, शिक्षक व मित्रमंडळी आणि आजी-माजी विद्यार्थ्यांनी यथोचित सत्कार केला त्यामुळे मी अक्षरशः भारावून गेलो आहे.विद्यार्थ्यांनी नेहमी चांगल्याशी संगत करावी वाईटपासून कायम दूर रहावे असा मोलाचा सल्ला त्यांनी दिला. जीवनात कष्ट केल्याशिवाय यश मिळत नाही त्यामुळे ध्येयप्राप्तीसाठी सतत प्रामाणिकपणे प्रयत्न केला पाहिजे असे त्यांनी सांगितले.

यावेळी आदर्श मुख्याध्यापक बाळू गुंड, रामचंद्र घोंगाणे, प्राचार्य चंद्रकांत ढोले, बापूराव सरक, बाळासाहेब थोरात, व्यंकटेश थोरात, सज्जन थोरात, भिमराव गुंड, सत्यवान थोरात, दत्तात्रय थोरात, वेताळ तळेकर, दिलीप थोरात, नारायण खांडेकर, अरुण मोरे, हनुमंत उबाळे, रघुनाथ पासले, नागनाथ बरबडे, शिवाजी शिंदे, जोतिराम थोरात, शांताबाई गुंड, जलवंती तळेकर, वत्सला घोंगाणे, सुरेखा थोरात, वैशाली मेडसिंग-पाटील, राणी गुंड, उर्मिला पासले, मेघना गुंड,माधुरी गुंड, मिरा थोरात, मोनिका उबाळे, पद्मिनी शिंदे, शोभा बरबडे, वैशाली घोंगाणे, आरटीओ योगिता थोरात, स्वाती तळेकर, राजाभाऊ कदम, बबन उबाळे, तुकाराम कदम, प्रा. डॉ.नेताजी कोकाटे, डॉ.संतोष कदम, प्रा.नितीन कदम, डॉ. ओंकार थोरात, डॉ.समाधान थोरात, डॉ.सोहम तळेकर, दिपक तळेकर, रवींद्र घोंगाणे, सुधीर गुंड, शहाजहान मुलाणी, रविकांत पेठे, बाळासाहेब शेळके, रामचंद्र तिपे, आप्पासाहेब काकडे, दुर्गाकांत, शरद म्हमाणे, पोपट भोसले, चंद्रकांत पाटील, रामलिंग लोंढे, जगन्नाथ शेंडगे, नेताजी उबाळे, सुशेन भांगे, पांडुरंग खांडेकर, किशोर गुंड, सुहास शिंगाडे, समाधान कोकाटे, दिनेश गुंड, सज्जन मुळे, कैलास सस्ते, सुशेन मुळे, डॉ.राजवर्धन गुंड, शिवम गुंड, मेघश्री गुंड, समृद्धी गुंड यांच्यासह ग्रामस्थ, शिक्षक, नातेवाईक, मित्रमंडळी व आजी-माजी विद्यार्थी मोठ्या संख्येने उपस्थित होते.

**सोलापूर महानगरपालिका,सोलापूर**
इंद्रभुवन आंबेडकर चौक, रेल्वे लाईन्स, सोलापूर-४१३००१
**सार्वजनिक आरोग्य अभियंता (जलवितरण विभाग)** smcphewtr@gmail.com

जा.क्र.साआअ/जल/३७४ **सातवी मुदतवाढ** दि.०३/०६/२०२५

सोलापूर म.न.पा.चे विभागीय कार्यालय क्र. १ ते ८ कडील प्रभागातील दुषित पाणी पुरवठा सुधारणे कामी नव्याने पाईप लाईन टाकणेकरीता लोकशाहीर आण्णाभाऊ साठे नागरी वसती सुधारणा योजना सन २०२५-२६ अंतर्गत कामाचे ई-निविदेस खालीलप्रमाणे सातवी मुदतवाढ देण्यात आली आहे.

1)Tender ID-2025-SMC-1171591_1, 2)Tender ID-2025-SMC-1171434_1, 3)Tender ID-2025-SMC-1171604_1, 4)Tender ID-2025-SMC-1171637_1, 5)Tender ID-2025-SMC-1171653_1

या कामाचे टेंडर शासनाच्या https://mahatenders.gov.in या वेबसाईटवर दि.०५/०६/२०२५ रोजी सकाळी १०.०० पासुन पाहण्यास उपलब्ध आहे.

**सही/-**
**प्र.सार्वजनिक आरोग्य अभियंता**
**सोलापूर महानगरपालिका, सोलापूर**

# नागरिकांच्या समस्या थेट प्रशासनासमोर

सोलापूर (कटुसत्य वृत्त):- सोलापूर महानगपालिकेच्या वतीने सोलापूर शहरातील नागरिकांच्या समस्यांचे तातडीने आणि प्रभावीपणे निराकरण करण्यासाठी महानगरपालिकेने जनता दरबार अभिनव उपक्रम हाती घेतला आहे. झोन कार्यालयात प्रत्येक बुधवारी दुपारी १२ ते २ या वेळेत हा दरबार होणार आहे. यासाठी खास नियंत्रण अधिकाऱ्यांची नियुक्ती आयुक्त डॉ. सचिन ओम्बासे यांनी केली आहे.

विभागीय कार्यालयातील जनता दरबारमध्ये नियुक्त नियंत्रण अधिकारी उपस्थित राहत जनतेच्या समस्या जाणून घेत त्या तक्रारीच्या निपटारा करणार आहेत. जनता दरबार उपक्रमाचा मुख्य उद्देश नागरिकांना प्रशासनाशी थेट संवाद साधणे, शहरातील समस्या मांडण्याची संधी उपलब्ध करून



देणे, त्यांच्या समस्या जाणून घेणे, त्यावर जलदगतीने उपाययोजना करणे हा आहे. यामुळे प्रशासन अधिक लोकाभिमुख होऊन नागरिकांच्या अपेक्षा पूर्ण करू शकेल. या नव्या उपक्रमामुळे शहरातील नागरिकांच्या समस्या अधिक प्रभावीपणे सोडवता येतील असा विश्वास महापालिका आयुक्त डॉ. सचिन ओम्बासे यांचा आहे. तरी नागरिकांनी या जनता दरबार मध्ये सहभागी होऊन आपल्या समस्या मांडण्याचे अवाहन महापालिका आयुक्तांच्या वतीने करण्यात आले.

**झोननिहाय जनता दरबार व नियंत्रण अधिकारी**

- झोन १ : उपायुक्त तैमूर मुलाणी (पहिला व तिसरा बुधवार )
- झोन २ : उपायुक्त किरणकुमार मोरे (पहिला व तिसरा बुधवार)
- झोन ३ : उपायुक्त आशिष लोकरे (पहिला बुधवार)
- झोन ४ : उपायुक्त आशिष लोकरे (दुसरा बुधवार)
- झोन ५ : उपायुक्त किरण मोरे (दुसरा व चौथा बुधवार)
- झोन ६ : उपायुक्त आशिष लोकरे (तिसरा बुधवार)
- झोन ७ : अतिरिक्त आयुक्त रवि पवार (पहिला व तिसरा बुधवार)
- झोन ८ : उपायुक्त तैमूर मुलाणी (दुसरा व चौथा बुधवार)

जनजागृती प्रबोधन मंच, टेंभुर्णी संचलित,

**मूक बधिर निवासी शाळा,टेंभुर्णी**

**जाहीर खुलासा**

जनजागृती प्रबोधन मंच संचलित, मूक बधिर निवासी शाळा, टेंभुर्णी. गट.क्र. ९४/१, जुना सोलापूर - पुणे हायवे, चव्हाणवाडी, टेंभुर्णी. ता. माढा. जि. सोलापूर हि शाळा दिनांक ०१ एप्रिल १९९५ पासून दिनांक २८ जुलै २०२४ पर्यंत २९ वर्षे प्रबोधन नगर, मिरज रोड, पाण्याच्या टाकी जवळ, सांगोला. ता. सांगोला. जि. सोलापूर या ठिकाणी चालवली जात होती. सदरची जनजागृती प्रबोधन मंच संचलित, मूक बधिर निवासी हि शाळा मा. आयुक्त साहेब, दिव्यांग कल्याण आयुक्तालय, पुणे यांच्या आदेशा नुसार दिनांक २९/०७/२०२४ पासून मौजे टेंभुर्णी.ता.माढा. जि. सोलापूर या ठिकाणी कायदेशीर रित्या सुवस्थित सुरू आहे.

स्थलांतरीत झाले बाबतचे जाहीर खुलासा दिनांक ०३/०८/२०२४ रोजी १. सांगोला वृत्तवेध २. सांगोला नगरी ३. जनमत पेपरला दिलेला आहे. शाळा स्थलांतरीत झाले नंतर या शाळेतील कर्मचारी १. श्री. वसंत बाबासाहेब पाटील. २. श्री. अनिल वसंत कांबळे. ३. श्री लक्ष्मण भिमराव खरात. ४. श्री. उमेश मारुती कोळेकर. ५. श्री. शशिकांत राजाराम गायकवाड. ६. श्री दिपक भगवान गेजगे हे कर्मचारी शाळेवर हजर झालेले नाहीत सतत गैरहजर राहिल्याने त्यांना संस्थेमार्फत कायदेशीर नोटीसा देऊन त्यांची चौकशी समिती नेमून चौकशी होऊन चौकशी अंती त्यांची सेवा समाप्त केलेली आहे तसेच त्यांनी मा. उच्च न्यायालय, मुंबई येथे WRIT PETITION NO:-13543 OF 2024 वरील व्यात्त्कींनी अपिल दाखल केलेले आहे सदर अपिलाचे काम चालू आहे सदर ची बाब न्याय प्रविष्ठ असताना व जनजागृती प्रबोधन मंच संचलित मूक बधिर निवासी शाळा. टेंभुर्णी या शाळेचे कर्मचारी नसताना त्यांनी संस्थेच्या विरुद्ध चूकिची व बेकायदेशीर बातमी दिनांक ०३/०६/२०२५ रोजी जनसत्य व दिनांक ०४/०६/२०२५ रोजी सांगोला नगरी या पेपरमध्ये दिलेली आहे सदरची बातमी हि संस्था व मुख्याध्यापिका यांच्या विरुद्ध खोटया व चूकिच्या बातम्या देऊन बदनामी करीत आहेत.

तसेच जनजागृती प्रबोधन मंच संचलित, मूक बधिर निवासी शाळा, टेंभुर्णी या शाळेचे कर्मचारी नसताना जिल्हा परिषद, सोलापूरच्या उपोषण गेट समोर बसून चूकिचें व बेकायदेशीरपणे आंदोलन करत दबाव आणून संस्था बदनाम करण्याचा प्रयत्न करीत आहेत. स्व:ताची सेवा समाप्त झाल्या कारणाने मूक बधिर निवासी शाळा बंद पाडून विद्यार्थ्यांचे व पालकांचे नूकसान करू लागले आहेत. त्यांच्या आंदोलनावर व दिनांक ०३/०६/२०२५ रोजी जनसत्य या पेपरमधे दिलेल्या बातमीवर कोणीही विश्वास ठेऊ नये तसेच या पुढेही यांनी दिलेल्या कोणत्याही पेपर मधील कोणत्याही बातम्यांवर कोणीही विश्वास ठेऊ नये.

सदर व्यक्तींचे शाळेचे अथवा संस्थेचे कर्मचारी म्हणून आज रोजी कोणतेही कायदेशीर अस्तित्व नाही त्यामुळे नमूद व्यक्तींना शासन स्तरावर किंवा खाजगी स्तरावर पत्रव्यवहार करण्याचा किंवा इतर कोणताही व्यवहार करण्याचा कायदेशीर हक्क त्यांना नाही संस्थेचे अथवा शाळेचे कर्मचारी म्हणून नमूद व्यक्तींनी कोणताही पत्रव्यवहार किंवा संस्थेचे कर्मचारी म्हणून कसल्याही प्रकारचा आर्थिक करार केला असल्यास त्यास शाळा व्यवस्थापन तथा संस्था व्यवस्थापन जबाबदार राहणार नाही याची नोंद सोलापूर जिल्हातील तमाम शासकीय कार्यालये, निमशासकीय संस्था, खाजगी संस्था व परिसरातील तमाम लोकांनी नोंद घ्यावी हा जाहीर खुलासा देण्यात येत आहे.

**अध्यक्ष-**
**जनजगृती प्रबोधन मंच, टेंभुर्णी**
**गट क्र.९४/१ जुना सोलापूर, पुणे रोड**
**चव्हाणवाडी टेंभुर्णी, ता.माढा, जि.सोलापूर**

**एस.एल.पाटील**
**मुख्याध्यापिका**
**जनजगृती प्रबोधन मंच टेंभुर्णी संचलित**
**मूक बधिर निवासी शाळा टेंभुर्णी,**
**ता.माढा,जि.सोलापूर**

# विजय माने यांचा सेवानिवृत्ती बद्दल सत्कार

**टेंभुर्णी (कटूसत्य वृत्त):-** बबनराव शिंदे माध्यमिक व उच्च माध्यमिक विद्यालयातील शिक्षक या पदावर कार्यरत असलेले कन्हेरगांव तालुका माढा येथील सुपुत्र विजय बब्रुवान माने व त्यांच्या पत्नी अनिता माने यांचा कन्हेरगांव ग्रामस्थांच्या वतीने सपत्नीक नागरी सत्कार करण्यात आला. कन्हेरगांव तालुका माढा येथे ३ जुन रोजी विजय बब्रुवान माने यांच्या सेवानिवृत्ती बद्दल सत्कार समारंभ कार्यक्रमाचे आयोजन करण्यात आले होते. कन्हेरगांवचे माजी उपसरपंच धनंजय मोरे यांनी या कार्यक्रमाचे आयोजन केले होते. विजय माने यांनी अकोले खुर्द येथील बबनराव शिंदे माध्यमिक विद्यालय 27 वर्ष सेवा केली आहे. ते यापुढेही समाजासाठी काम करत राहतील असा विश्वास प्रा. हनुमंत पाटील यांनी व्यक्त केला. माजी चेअरमन नागेश मोरे व प्रा. हनुमंत पाटील



यांच्या हस्ते विजय माने, अनिता माने, प्रसार माने, भारती माने यांचा सत्कार करण्यात आला. यावेळी कन्हेरगांवचे माजी उपसरपंच धनंजय मोरे, सोसायटीचे माजी चेअरमन नागेश मोरे, प्रा. हनुमंत पाटील, पोपट मोरे, ग्रामपंचायत सदस्य बाळासाहेब पाटील, ग्रामपंचायत सदस्य सुधीर मोरे, सतिश हांडे, माजी ग्रामपंचायत सदस्य सोमनाथ कदम, जालिंदर केदार, राजेंद्र केदार, विकास माने, शाळा व्यवस्थापन समितीचे माजी अध्यक्ष संजय डोके पाटील, तानाजी पाटील, अमोल पाटील, महेश माने, सौरव माने, गजानन डोके पाटील, दत्तात्रय डोके, प्रसार माने उपस्थित होते. स्वागत व आभार विजय माने यांनी मानले.

**निर्मल व्यसनमुक्ती केंद्र**

**मानसिक आजार, व्यसनमुक्ती, लैंगिक समस्या** स्किझोफ्रेनिया, बायपोलार मुड डिसऑर्डर, उन्माद, डिप्रेशन, ओ. सी. डी, मंत्रचळेपणा इ. मानसिक आजारासाठी, दारू, तंबाखु, सिगारेट, गुटखा, मावा, गांजा, भांग, मिश्री इ. व्यसनमुक्तीसाठी, शीघ्रपतन, नपुसकता, वीर्यनाश, हस्तमैथुनामुळे कमजोरी इ. लैंगिक समस्यांसाठी वृद्ध लोकांना सांभाळण्यासाठी सुश्रुषा केंद्र व नातेवाईकांशिवाय अँडमीट करण्याची सोय **निर्मल व्यसनमुक्ती पुनर्वसन व सुश्रुषा केंद्र, स्टेशन रोड, मिरज.**

-: संपर्क :-
8083608083
9922646566
8698732109

(सरकार मान्य)
**अथर्व पेस्ट कंट्रोल**
An ISO 9001-15
सर्टीफाईड कंपनी
**प्रोप्रा. हरी सुभाष विरपे**
**9822964815**
**9421984815**
झुरळ, पाल, मुंगी, वाळवी, डास, जाळी, माशी, ढेकुण, उंदीर, घुस इ. नियंत्रण

**वाचकांसाठी निवेदन:** या अंकात प्रसिद्ध होणाऱ्या सर्व प्रकारच्या जाहिरातीमधील मजकूर जाहिरातदाराने दिल्यानुसार प्रसिद्ध केला जातो. यातील कोणत्याही माहितीच्या अथवा आहवानाच्या सत्यतेबाबत दैनिक कटूसत्य हमी घेऊ शकत नाही याची कृपया नोंद वाचकांनी घ्यावी.




अविवाहितांच्या, नवविवाहितांच्या, चाळीशीनंतरच्या स्त्री- पुरुषांच्या तसेच मधुमेही व व्यसनाधिनांच्या
**सेक्स समस्या**
जर्मनमेड होमिओपॅथिक औषधे-शास्त्रोक्त मार्गदर्शन



**डॉ.अभय मुथा** (मनोलैंगिक विकार तज्ञ)
B.H.M.S.,M.D (A.M) , M.D (Acu ).,P. G ( Sexology )
२१ वर्षाचा प्रदीर्घ अनुभव (राष्ट्रीय पुरस्कार प्राप्त)
१ लाखांहून अधिक रुग्णांवर यशस्वी उपचार
**सेक्स सुपर स्पेशालिटी होमिओपॅथिक क्लिनिक**
विनायकनगर, नगर-पुणे रोड, अहिल्यानगर
www.sextreatment.in
94 22 23 90 13

## कटूसत्य शब्दकोडे



**उभे शब्द :** १) प्रतापगडच्या जवळचे थंड हवेचे ठिकाण २) आ. बच्चू कडू यांची संघटना ३) ईश्वर ४) नातेवाईक ५) सध्या भाजपमध्ये नसलेले एक माजी केंद्रीय मंत्री - **** सिन्हा ६) लंकापती ८) एक म्हण-अति ** अन् भीक माग १०) पुराणकाळापासूनची गोष्ट १४) जवळीक, घसट, *** करणे १४) एक म्हण-मनी नाही ** अन् देवा मला पाव १७) विषमच्या विरूध्दार्थी १८) दमयंतीपती २०) लहान बाळाचे भविष्य ही लिहिते असे म्हणतात २१) भारतीय क्रिकेट टीममधून निवृत्त झालेला फलंदाज २२) रक्त (ग्रामीण भाषेत) २५) संकटावर जय मिळवणे, ** करणे २७) जसा ** तशी प्रजा ३०) दुधापासून बनविलेले पेय ३१) पसरलेला सुगंध ३२) धावणे (इंग्रजीत) ३३) नोटबुक (मराठीत) ३४) माफी मागणे (इंग्रजीत) ३६) दुधापासून बनवितात ते ३८) एप्रिल महिन्याचे दिवस ३९) समुद्राच्या पाण्याची चव ४१) जगप्रसिध्द कालवा ४३) बोझा, वजन ४४) बाण ४६) एक आणि एक मिळून होणारी संख्या

**आडवे शब्द :** १) महाराष्ट्राशेजारील एक राज्य
४) कोकणातील भाजपवासी झालेले स्ट्राँग नेते
७) हव्यास, स्वार्थ ८) रात्र (हिंदीत)
८) खारी टोस्टप्रमाणे एक बेकरीचा पदार्थ
१०) आमीर खानचा मुलींच्या कुस्तीवरील चित्रपट
११) गाडीच्या चाकांचे घर्षण होवू नये म्हणून वापरतात ते तेल
१२) शिजविलेला तांदूळ १३) चुकीचे (हिंदीत)
१६) श्वास घेण्याची क्रिया १९) सत्व, सक उलट लिहा
२१) सत्कार, मुलाचे एक नाव २३) वाळूच्या रेषांवरून भविष्य जाणण्याची पध्दत
२४) डामडौल २६) टिकून राहणे, टिकणे
२८) पणतीतील कापसाची लहान वळई २९) सपाट
३१) पत्नीच्या घरी राहणारा पती ३५) श्रीविष्णूचा एक अवतार
३६) कथेतील पंख असलेली स्त्री ३७) भय ४०) क्रिकेटपटू महेंद्रसिंग **
४१) घराच्या पाठीमागील बाजू
४२) भाजपच्या एक माजी केंद्रीय मंत्री ४५) एक अभिनेत्री-*** टंडन ४७) कापड फाटताना होणारा आवाज ४८) थंड हवेचे एक ठिकाण

## सुडोकु - 267

| | | | | | | | | |
|---|---|---|---|---|---|---|---|---|
| | 3 | 1 | 6 | 7 | | 4 | | 9 |
| | | | 8 | 3 | | | | |
| 8 | 2 | | | | | | 1 | |
| | 7 | 4 | | | 8 | 1 | 6 | |
| | 8 | | | 6 | | | | 4 |
| 9 | | 2 | | | | | 7 | 3 |
| 4 | 9 | | | 5 | 7 | 2 | 3 | |
| 2 | | | | 9 | | 5 | | 7 |
| 7 | | 3 | 2 | | | 6 | | 1 |

# पुण्यश्लोक अहिल्यादेवी होळकर सोलापूर विद्यापीठला २० वर्षे पूर्ण

**सोलापूर (कटूसत्य वृत्त):-** पुण्यश्लोक अहिल्यादेवी होळकर सोलापूर विद्यापीठ आता २० वर्षांचे (१ ऑगस्ट रोजी वर्धापनदिन आहे.) झाले आहे, देशपातळीवर विद्यापीठ एक रोल मॉडेल बनेल, याद्दष्टीने विद्यापीठाचे प्रयत्न आहेत. विद्यापीठातील विविध संकुलांसह संलग्नित महाविद्यालयांमध्ये पदवी, पदव्युत्तरचे शिक्षण पूर्ण करणारे विद्यार्थी केवळ पदव्या घेऊन नोकरी मागणारे नव्हे तर रोजगार देणारे उद्योजक, संशोधक बनतील, असा विश्वास कुलगुरू डॉ. प्रकाश महानवर यांनी व्यक्त केला. सोलापूर शहर-जिल्ह्यातून तरुणांचे दजेर्दार उच्चशिक्षणासाठी होणारे स्थलांतर आगामी काळात थांबेल, असेही त्यांनी सांगितले.



एकाच जिल्ह्यासाठी स्वतंत्र विद्यापीठ म्हणून देशभरात पुण्यश्लोक अहिल्यादेवी होळकर सोलापूर विद्यापीठ ओळखले जाते. विद्यापीठात सध्या ११ संकुले असून त्याअंतर्गत तज्ज्ञ प्राध्यापक आहेत. याशिवाय विद्यापीठात कौशल्य विकासाचे १४७ कोर्स सुरू आहेत. त्याअंतर्गत पॅरामेडिकल, शैक्षणिक, एनजीओ अशा १६३ संस्था संलग्न आहेत. विविध संस्थांशी विद्यापीठाने ११ सामंजस्य करार केले असून आणखी पाच करार होतील. या विभागांतर्गत तीन, सहा महिने व एक वषार्चे कोर्स आहेत. त्यामध्ये नऊ विभाग आहेत. तसेच तंत्रज्ञान संकुलात गतवर्षी नऊ अभ्यासक्रम वाढविले, यंदाही त्यात बी. टेक. बायोटेक्नॉलॉजी, फूड टेक्नॉलॉजी, सरफेस कोटिंग टेक्नॉलॉजी, केमिकल टेक्नॉलॉजी, नॅनो सायन्स ॲण्ड टेक्नॉलॉजी, सायबर सेक्युरिटी, डेटा सायन्स, आर्टिफिशियल इंटेलिजन्स ॲण्ड मशीन लर्निंग अशा अभ्यासक्रमांची वाढ होणार आहे. समाजकल्याण विभागातर्फे विद्यापीठातील ६२ अभ्यासक्रमाच्या शिष्यवृत्ती मिळते.

आगामी काळात विद्यापीठात दिव्यांग, तृतीयपंथांसाठी उच्चशिक्षणाचे नवे संकुल सुरू करण्याचाही प्रस्ताव आहे. रंगभवन येथील विद्यापीठाची अभ्यासिका अद्ययावत केली जाणार आहे. लोकशाहीर अण्णाभाऊ साठे चौकातील डॉ. कोटणीस स्मारक विद्यापीठाकडे हस्तांतरित करावे, अशी मागणी महापालिका आयुक्तांकडे करण्यात आली आहे. त्याठिकाणी मोठे भाषा संकुल उभारण्याचेही नियोजन आहे. सर्व विद्यार्थ्यांची माहिती एकत्रित मिळावी, यासाठी विद्यापीठाने १५० टीबी क्षमतेचा डेटा सर्व्हर तयार करण्याचा निर्णय घेतला आहे. त्यानंतर परीक्षांचे निकाल अचूक लागतील, असेही कुलगुरू डॉ. महानवर म्हणाले.

विद्यार्थ्यांच्या कला व क्रीडा गुणांनाही वाव आणि जॉब फेअरही विद्यापीठाने 'पीएम उषा' योजनेतील अनुदानावर ४८२ एकर परिसरात राज्यातील सर्वात मोठे इनडोअर स्टेडियम उभारले आहे. त्याठिकाणी बहुतेक खेळ विद्यार्थी १२ महिने खेळू शकतील, अशी व्यवस्था आहे. या संकुलाचे संचालक डॉ. अतुल लकडे हे आहेत. याशिवाय आता आउट डोअर स्टेडिअमचेही नियोजन आहे. दुसरीकडे कला विभागाचे संचालक डॉ. केदारनाथ काळवणे यांच्या मार्गदर्शनाखाली दरवर्षी विद्यापीठातर्फे युवा महोत्सव राबवून विद्यार्थ्यांना कलागुण सादर करण्याची संधी उपलब्ध करून दिली जाते. याशिवाय राज्य, देशपातळीवरील अशा स्पर्धांमध्ये देखील विद्यार्थी सहभागी होतात. त्यांचा खर्च विद्यापीठाकडून केला जातो. याशिवाय विद्यार्थ्यांना रोजगार मिळावा म्हणून ट्रेनिंग व प्लेसमेंट सेल सुरू केले आहे. याच्या मदतीने कौशल्य विकास विभागातर्फे सप्टेंबर-ऑक्टोबरमध्ये जॉब फेअर घेतला जाणार आहे. विद्यापीठात 'कमवा व शिका' योजना सुरू त्यासाठी आठ ते दहा लाखांची तरतूद केली आहे.

कौशल्य विकास केंद्राद्वारे १४७ कोर्सेस, तांत्रिक (फोटोग्राफी, फॅशन डिझायनिंग, ब्युटी पार्लर टेक्निशियन, ब्युटी पार्लर),

कॉमर्स मॅनेजमेंट : टॅली, शेअर मार्केट, डिजिटल मार्केटिंग,

संगणकशास्त्र : ऑफिस ॲटोमेशन, पायथॉन, हाडूप, सायबर सिक्युरिटी,

आरोग्य : एक्सरे व डायलिसिस टेक्निशियन, ऑपरेशन थिएटर व हेल्थ असिस्टंट, योगा

पारंपरिक : मॉन्टेसरी टिचर, स्पोकन इंग्लिश, फोटोग्राफी, टीव्ही-रेडिओ अँकरिंग, टुरिझम गाईड, डिजिटल जर्नालिझम,

नवीन : प्राचीन वस्तू, वास्तू जतन व संवर्धन कोर्स, संस्कृत संभाषण, अनुवाद (मराठी, हिंदी, इंग्रजी), ॲग्री टुरिझम, मेडिकल टुरिझम, ज्येष्ठ नागरिक संगोपन प्रमाणपत्र अभ्यासक्रम, एआय, मशीन लर्निंग, डेटा सायन्स, स्टॅटेस्टिक, धार्मिक, सांस्कृतिक पर्यटन मॅनेजमेंट, विद्यापीठातील ११ संकुल सोशल सायन्स, रसायनशास्त्र, संगणकशास्त्र संकुल, अर्थ सायन्स, फिजिकल सायन्स (भौतिकशास्त्र), जैवविज्ञान, तंत्रज्ञान, कला व ललित कला भाषा कॉमर्स ॲण्ड मॅनेजमेंट स्कूल ऑफ अलाईड हेल्थ सायन्सेस

**विद्यापीठाचा विस्तार...**

सध्याचा कॅम्पस : ३६ एकर व नवीन कॅम्पस-४८२ एकर, संलग्नित अभियांत्रिकी कॉलेज : ६, फार्मसी कॉलेज : ३, एकूण संलग्नित कॉलेज : ११५, एकूण प्रवेशीत विद्यार्थी : ७०,०००, वसतिगृह : वसतिगृह २०० मुले व २०० मुलींसाठी स्वतंत्र सोय, ३० हजारांवर पुस्तकांचा ग्रंथालयात खजिना.

विद्यापीठात विद्यार्थ्यांसाठी सुसज्ज ग्रंथालय असून त्यात विद्यार्थ्यांसाठी वायफाय मोफत आहे. एकूण ३० हजारांहून अधिक पुस्तके त्याठिकाणी आहेत. विद्यार्थ्यांना ऑनलाइन माहिती बघण्यासाठी संगणकही उपलब्ध आहेत. याशिवाय यापुढे पुण्यश्लोक अहिल्यादेवी होळकर, महात्मा बसवेश्वर, डॉ. बाबासाहेब आंबेडकर, छत्रपती संभाजी महाराज, साहित्यरत्न अण्णाभाऊ साठे, या महापुरुषांच्या नावे विद्यापीठात अध्यासन केंद्रे सुरू करण्यात आली आहेत. आगामी काळात या केंद्रांतर्फे महापुरुषांच्या कार्याविषयी प्रमाणपत्र अभ्यासक्रम सुरू करण्याचेही विद्यापीठाचे नियोजन आहे.

पैसा शिक्षणाच्या आड कधीच येत नाही. सातारा जिल्ह्यातील देवडी (ता. माण) या छोट्याशा गावातील प्रकाशने दररोज सहा किलोमीटर पायी जाऊन शेजारील गावातील जिल्हा परिषदेच्या शाळेतून प्राथमिक शिक्षण घेतले. त्यानंतर लोक सहभागातून सुरू झालेल्या रयत शिक्षण संस्थेच्या शाळेतून माध्यमिकपर्यंतचे शिक्षण पूर्ण केले. पुढे दहिवडी कॉलेजमधून बीएस्सी आणि पुढे मुंबई विद्यापीठातून उच्चशिक्षण पूर्ण केले. त्याच ठिकाणी संशोधन, पीएच.डी. शिक्षण घेऊन प्रकाश डॉक्टर झाला आणि तेथेच ३२ वर्षे सेवा बजावली. त्यानंतर आता डॉ. प्रकाश महानवर हे पुण्यश्लोक अहिल्यादेवी होळकर सोलापूर विद्यापीठाचे कुलगुरू आहेत. पैसा शिक्षणाच्या आड कधीच येत नाही असा अनुभव त्यांनी घेतला आणि इच्छाशक्ती, कष्ट करण्याची तयारी असेल तर निश्चितपणे ध्येयपूर्ती होऊ शकते, असा सल्ला त्यांनी विद्यार्थ्यांना दिला. सोलापुरातील तरुणांचे ब्रेन उत्तम आहे, पण त्याला प्रोत्साहनाची गरज आहे. त्यानुसार विद्यापीठातर्फे विद्यार्थ्यांसाठी सोलापूर विद्यापीठ शार्क टँक (आयडिया, नावीन्यपूर्ण कल्पना देणे) सुरू करण्यात आल्याचेही कुलगुरू म्हणाले.

नवीन शैक्षणिक धोरण खूपच चांगले आहे. नवीन शैक्षणिक धोरणामुळे कला-वाणिज्य, विज्ञान शाखेतील विद्यार्थ्यांना त्यांच्या आवडीचे विषय घेऊन शिकता येते. त्यातून ज्ञान वाढेल व नोकरी, रोजगाराच्या भरपूर संधी देखील विद्यार्थ्यांना उपलब्ध होतील. विद्यापीठाने पदवी व पदव्युत्तर पदवीसाठी नवीन शैक्षणिक धोरण लागू केले आहे. सहा-सात वर्षे लागतील बदल दिसायला पण त्याचे परिणाम खूपच चांगले असतील. या धोरणामुळे अभ्यासक्रम किंवा शिक्षणासाठी कोणतीही मर्यादा, बंधन राहिलेले नाही. त्यामुळे संशोधनास वाव मिळेल आणि परिपूर्ण विद्यार्थी घडतील. डॉ. प्रकाश महानवर, कुलगुरू, पुण्यश्लोक अहिल्यादेवी होळकर सोलापूर विद्यापीठ.

# पोलीस अधिक्षक अतुल कुलकर्णी यांच्या विकसीत गाव योजनेचा शुभारंभ!

**सोलापूर (कटूसत्य वृत्त):-** पोलीस अधिक्षक अतुल कुलकर्णी यांची "विकसित गाव" ही संकल्पना आहे. सदर संकल्पनेमध्ये गावातील शेतकऱ्यांनी जलतारा प्रकल्पातुन आपल्या शेतीला बारमाही पाणी उपलब्ध करणे, तसेच सेंद्रीय शेती करुन विषमुक्त भाजीपाला, फळे तयार करणे अभिप्रेत आहे. त्यातुन गावची आर्थिक परिस्थीती सुधारुन गाव गुन्हेगारीमुक्त करणे ही संकल्पना आहे. त्याचप्रमाणे आपल्या सोलापूर जिल्हयातील होणाऱ्या चारही वारींना येणाऱ्या वारकऱ्यांना वारी करणे सोपे जावे यासाठी रस्त्याचे कडेला वृक्षारोपण करुन हरीत वारी हा उपक्रम राबविणे आहे.



आज दि. ०४/०६/२०२५ रोजी अतुल कुलकर्णी, पोलीस अधिक्षक, सोलापूर ग्रामीण यांच्या संकल्पनेतुन त्यांनी मौजे फिसरे ता. करमाळा येथे मिशन विकसीत गाव अभियानाअंतर्गत सेंद्रीय शेती, जलतारा प्रकल्प व त्यांचे फायदे तसेच हरीतवारी याबाबत मागदर्शनपर शिबीर आयोजीत करुन फिसरे, ता. करमाळा येथील भरत आवताडे यांचे सेंद्रीय शेतीला भेट देवुन त्या ठिकाणी करमाळा तालुक्यातील सर्व पोलीस पाटील तसेच शेतीतज्ञ तसेच यशकल्याणी सेवाभावी संस्थेचे गणेश करे पाटील यांच्या सहकायार्ने सेंद्रीय शेती व जलतारा प्रकल्प यातुन होणारे शारिरीक व मानसिक फायदे तसेच सेंद्रीय शेतीच्या उत्पन्नातुन भविष्यात होणारा फायदा याबाबत मोलाचे मार्गदर्शन केले. सदर शिबीरामध्ये मा. श्री. अतुल कुलकर्णी, पोलीस अधिक्षक, सोलापूर ग्रामीण यांनी सेंद्रीय शेतीतील अन्नधान्यापासुन मानसिक व शारिरीक फायदे सांगितले. खेडयांचा विकास झाला तर महाराष्ट्र समृध्द होईल. महाराष्ट्र समृध्द झाला तर संपुर्ण राष्ट्र समृध्द होईल या उक्तीप्रमाणे काम करण्याच्या अनुषंगाने प्रत्येक गावामध्ये जलतारा प्रकल्पातुन जलसंधारण करण्याचे अवाहन केले. यामध्ये सोलापूर जिल्हयातील प्रथम १०० गावे विकसीत करुन संपुर्ण महाराष्ट्र व देशात रासायनीक शेतीला बगल देवुन सेंद्रीय शेतीतुन कमी खर्चात भरघोस उत्पन्न कशा प्रकारे मिळते याबाबत मोलाचे मार्गदर्शन केले. त्यांनी "सेंद्रीय शेती करा. स्वतःचे आरोग्य आणि उत्पन्न तसेच जमीनीची प्रत वाढवा" असे अवाहन केले. तसेच आयुष्य वाढवायचे असेल तर सेंद्रीय शेती करणे काळाची गरज असल्याचे शेतीतज्ञ तसेच यशकल्याणी सेवाभावी संस्थेचे गणेश करे पाटील यांनी सांगितले.

सदर कार्यक्रमाचे आभारप्रदर्शन भरत आवताडे यांनी केले व सुत्रसंचालन संदीप शिंदे-पाटील, पोलीस पाटील पोथरे यांनी केले. सदर कार्यक्रमाचे नियोजन करमाळा पोलीस ठाण्याचे पोलीस निरीक्षक, रणजीत माने व करमाळा पोलीस ठाणेकडील पोलीस अधिकारी व अंमलदार यांनी केले. पोलीस विभागाच्या नेहमीच्या कामातुन वेळ काढुन शेतकऱ्यांकरीता शिबीर आयोजीत केले. सदर ठिकाणी भरत आवताडे यांनी सेंद्रीय शेतीद्वारे उत्पन्न घेतलेली वांगी, आंबा तसेच पालेभाज्या यांची शेत सवार्ना दाखविण्यात आली. त्यांनतर पोलीस अधिक्षक अतुल कुलकर्णी यांनी आगामी आषाढी वारीस हरीतवारी संबोधुन प्रमुख पालखी मार्गावर वृक्षारोपण करण्याच्या कार्यक्रमाचे तसेच जलतारा प्रकल्पाचे उद्घाटन केले.

# आशियाई कराटे पदक विजेती भुवनेश्वरीचा भव्य नागरी सत्कार सोहळा

**सोलापूर (कटूसत्य वृत्त):-** आंतरराष्ट्रीय ऑलिंपिक समितीची मान्यता असलेल्या वर्ल्ड व आशियन कराटे फेडरेशन तर्फे ताश्कंद उझबेकीस्तान येथे नुकत्याच पार पडलेल्या आशियाई कराटे स्पर्धेत ऐतिहासिक कास्य पदक जिंकलेल्या भुवनेश्वरी संगीता सुरेश जाधव हिचा भव्य नागरी सत्कार सोहळा पोलीस आयुक्त एम राजकुमार (भा.पो. से.) यांच्या शुभहस्ते सन्मानचिन्ह व पुष्पगुच्छ देऊन जिल्हा क्रीडाधिकारी नरेंद्र पवार यांच्या अध्यक्षतेखाली व भाजप शहराध्यक्ष रोहिणी तडवळकर, रा. काँ. चे जिल्हाध्यक्ष संतोष पवार यांच्या सन्माननीय उपस्थितीत संपन्न झाला.



यावेळेस बोलताना पोलीस आयुक्तांनी भरभरुन प्रशंसा करत भुवनेश्वरीला एशियन गेम्स साठी शुभेच्छा दिल्या व सोलापूर विद्यापीठासह वैयक्तिक सर्व सहयोग देण्याची खात्री दिली.

क्रीडाधिकारी नरेंद्र पवार यांनी भुवनेश्वरीच्या क्रीडा कौशल्याचे कौतुक करत शासकीय नियमानुसार सर्व मदत करणार असल्याचे खात्रीपूर्वक सांगीतले.

या सन्मान सोहळ्यात भुवनेश्वरीचे बंधू ट्रेडिशनल व स्पोर्ट्स कराटे असोसिएशनचे सचिव मिहिर जाधव यांनी तिच्या गत पाच वर्षाच्या मेहनत, सराव व संघर्ष, दुखापत, शस्त्रक्रिया, रिहॅब, पुन्हा कौशल्य प्रशिक्षण अशा खडतर साधनेच्या प्रवासाची तसेच आशियाई व जागतिक स्तरावरील कर्तृत्वाच्या क्षणचित्रांची तयार केलेली क्लीप दाखवण्यात आली.

संयोजन समिती तर्फे ओम भैय्या दरक यांनी स्वागत केले. आई संगीता सुरेश जाधव यांनी प्रास्ताविक करताना स्कूल व युनिव्हर्सिटी गेम्स, नॅशनल व एशियन गेम्स मधील कराटे ची सद्य स्थिती तसेच भविष्यातील संधींचाही उहापोह केला.

सिनेट सदस्य प्रा. सचिन गायकवाड यांनी विद्यापीठ स्तरावरील कराटेची अंतर्भूतता व भुवनेश्वरीच्या माध्यमातून विद्यापीठाच्या कराटे खेळाडूंना मिळणारी संधी या निमित्ताने व्यक्त केली.

भाजप क्रीडा प्रकोष्ठचे जिल्हाध्यक्ष यशवंत पाथरुट यांनी समर्पक स्मृतिचिह्न प्रदान करुन भुवनेश्वरीचे अभिनंदन केले. क्रीडा भारतीचे पश्चिम महाराष्ट्र मंत्री ज्ञानेश्वर मॅकल यांनी सोहळ्याचा समन्वय साधला. यावेळेस संस्कृती प्रतिष्ठानच्या माया गांधी, चंदा पाटील, आशा ठकराल, क्रीडा शिक्षक संघटनेचे सुहास छंचुरे, उज्वल मलजी, पाटील, वसपटे तसेच गट शिक्षण अधिकारी जमादार आणि रुद्र चे आकाश झळकेनवरु, शिवलीला स्पोर्ट्सचे शिवशरण व स्वामी, ओकीनावाचे प्रभु, माजी उपक्रीडाधिकारी सत्येन जाधव, एस ई एस च्या नागणसुरे मॅडम यांच्या वतीनेही भुवनेश्वरीचा सत्कार करण्यात आला.

रुद्र ॲकॅडमीचे पालक प्रतिनिधी साईनाथ यादव यांनी आभार मानले. तर सहस्त्रार्जुन प्रशालेचे मोरेश्वर काटवे यांनी सुत्र संचालन केले. सोहळ्यात रुद्र अकादमी व नेहरु क्रीडांगणाचे खेळाडू, पालक, क्रीडा शिक्षक, शिक्षण संस्था प्रतिनिधी मोठ्या संख्येने उपस्थित होते.

# विद्यार्थ्यांनी यश पचवण्याची ताकद ठेवावी - कुलकर्णी



**माढा (कटूसत्य वृत्त):-** विद्यार्थ्यांनी यश पचवण्याची ताकद ठेवावी.यश मिळाले म्हणुन हुरळून न जाता कुणाशीही खुन्नस न बाळगता स्वतःची स्पर्धा स्वतःशी करुन आई वडिलांच्या कष्टाचे भान ठेवुन रोषण करावे.असे मत माजी प्रशासकीय अधिकारी प्रकाश कुलकर्णी यांनी व्यक्त केले.

कृषी भूषण कै.गणेश कुलकर्णी प्रतिष्ठाना मार्फत १० वी मधील गुणवंत विद्यार्थ्यांचा सत्कार समारंभ उपळाई (खुर्द) येथे पार पडला.यावेळी कुलकर्णी विद्यार्थ्यांर्ना मार्गदर्शन पर बोलत होते.

या सत्कार समारंभाला प्रमुख पाहुणे म्हणुन माढ्याच्या नगराध्यक्षा ॲड. मिनल साठे उपस्थित होत्या. इयत्ता दहावी व बारावी बोर्ड परीक्षेसह एम.टी.एस परीक्षेतील उत्तीर्ण झालेल्या विद्यार्थ्यांना शालेय उपयोगी साहित्य देऊन मान्यवरांचा सन्मान करण्यात आला.

पुढे बोलताना प्रकाश कुलकणीर्नी गोरगरिब शेतकऱ्यांच्या मुलांना स्पर्धा परीक्षेची तयारी करण्यासाठी मोफत अभ्यासिका व सुसज्ज ग्रथांलय लवकरच उभारणार असल्याची घोषणा करुन विद्यार्थ्यांच्या सर्वांगीण विकासासाठी गोरगरिब कुटूंबातील मुलाच्या मागे खंबीरपणे उभा राहण्याचा सल्ला दिला.

मिनल साठे यांनी प्रतिष्ठानने केलेल्या या सत्काराचे कार्यक्रमाचे कौतुक केले व असे कार्यक्रम समाजामध्ये विद्यार्थ्यांच्या सर्वांगीण विकासासाठी झाले पाहिजे असे मनोगत व्यक्त केले.

तसेच प्रतिष्ठांच्या अध्यक्षा ज्योतीताई कुलकर्णी यांनी या विद्यार्थ्यांना तसेच तालुक्यातील अन्य विद्यार्थ्यांच्या मागणी कोणतीही गरज लागली तर त्यांना मदत करण्याची भावना व्यक्त केली.

या कार्यक्रमासाठी उपाय खुर्द ची उपसरपंच सुनील राऊत हरि बोराडे सुधाकर देवकर नितीन कदम मुख्याध्यापक अनिल सर रावसाहेब पालकर शहाजी तात्या कदम दीपक जगताप कल्प कल्पनाताई जगदाळे रत्नप्रभा जगदाळे शहाजी पाटील रामभाऊ कदम औदुंबर कोल्हे तसेच प्रतिष्ठानचे सर्व सहकारी उपस्थित होते.

# राष्ट्रहिताच्या विचारांनी आयटीआयमध्ये साजरा होणार शिवराज्याभिषेक दिन

**मुंबई (कटूसत्य वृत्त):-** छत्रपती शिवाजी महाराज यांच्या राज्याभिषेक दिनाचे औचित्य साधत कौशल्य विकास विभागाच्या वतीने येत्या ६ जूनपासून राज्यातल्या सर्व आयटीआय संस्थांमध्ये राष्ट्रभक्तीच्या विषयांवर व्याख्यानमालेचे आयोजन करण्यात आले आहे. शिवराज्याभिषेक दिनाच्या निम्मिताने विद्यार्थ्यांमध्ये भारताचा जाज्वल्य इतिहास आणि देशासाठी समर्पणाची भावना रुजावी, पर्यावरण संवर्धनाची भावना जागृत व्हावी, या हेतूने या व्याख्यानमालेचे आयोजन केल्याचे कौशल्य, रोजगार, उद्योजकता व नाविन्यता मंत्री मंगलप्रभात लोढा यांनी आज मंत्रालयात आयोजित पत्रकार परिषदेत सांगितले. येत्या सहा जूनला मुख्यमंत्री देवेंद्र फडणवीस यांच्या व्हिडीओ संदेशाद्वारे या व्याख्यानमालेचे उदघाटन होणार आहे. त्याचबरोबर येत्या शैक्षणिक वषार्पासून आयटीआय मध्ये अत्याधुनिक सहा विषयांचे नवे अभ्यासक्रमही सुरु करणार असल्याची माहितीही लोढा यांनी यावेळी दिली.



छत्रपती शिवाजी महाराजांनी आपल्या पराक्रमाने हिंदवी स्वराज्याची स्थापना केली. महाराजांनी केवळ राज्य स्थापन केले नाही, तर प्रभावी प्रशासन, सामाजिक समरसता, जनकल्याण आणि कायद्याचे राज्य निर्माण करून सुराज्य घडवले हे विचार महाराष्ट्राच्या मातीत रुजवले. आजही महाराजांच्या विचारांची समाजाला आणि राष्ट्राला अत्यंत गरज असल्याने कौशल्य विकास विभागाने शिवराज्याभिषेकाच्या मुहूर्तावर राज्यव्यापी १०९७ आयटीआय मध्ये व्याख्यानमालेचे आयोजन केले असल्याचे मंत्री मंगलप्रभात लोढा यांनी स्पष्ट केले.

कुटुंब प्रबोधन, सामाजिक समरसता, पर्यावरण संरक्षण, नागरी कर्तव्ये आणि स्वदेशी विचार हे पंच परिवर्तन संकल्पनेचे मुख्य आधारभूत विषय असून या व्याख्यानमालेत हेच विषय अंतर्भूत करण्यात आले आहेत अशी माहितीही मंत्री लोढा यांनी यावेळी दिली. या व्याख्यानामुळे नागरिकांना आपल्या कर्तव्याची जाणीव होईल. कायद्याचे पालन केल्याने राष्ट्र समृद्ध होऊन प्रगती साधता येईल. बंधुभाव वाढीस लागल्याने समाजातील भेद दूर होतील. पर्यावरणाचे संवर्धन करून प्रदूषण विरहित स्वच्छ व सुंदर देश उभा राहील. कुटुंब प्रबोधनामुळे कुटुंब व्यवस्थेत शांती, सुसंवाद, सौहार्द निर्माण होईल, असा विश्वास ही त्यांनी यावेळी व्यक्त केला. या उपक्रमात जनतेने ही सहभाग घ्यावा असे आवाहनही त्यांनी यावेळी केले. यावेळी व्यवसाय शिक्षण आणि प्रशिक्षण संचालनालयाचे प्रभारी संचालक सतीश सूर्यवंशी, उपस्थित होते.

कौशल्य विकास विभागाने आणलेल्या नव्या खाजगी - सार्वजनिक अर्थात पीपीपी धोरणाला उद्योगक्षेत्राचा चांगला प्रतिसाद लाभत असून येत्या शैक्षणिक वर्षापासून सहा नवे अभ्यासक्रम सुरु करण्यात येणार आहेत. यात सौर ऊर्जा तंत्रज्ञ, इलेक्ट्रिक वाहन तंत्रज्ञ, ड्रोन तंत्रज्ञ, आर्टिफिशिअल इंटिलिजन्स आणि इंडस्ट्रियल रोबोटिक्स या विषयांचा समावेश करण्यात आला आहे. राज्यभरातल्या आयटीआय मध्ये सुमारे १ लाख २० हजार विद्यार्थ्यांनी नोंदणी केली असून यातील बहुसंख्य विद्यार्थ्यांना जागतिक दर्जाचे आधुनिक प्रशिक्षण मिळणार आहे. या नव्या उपक्रमामुळे विद्यार्थ्यांना रोजगाराचे जागतिक दालन उघड होणार असल्याचा विश्वास यावेळी मंत्री लोढा यांनी व्यक्त केला.

# शहर अध्यक्ष पदाचा कार्यकाल स्वामी चरणांना समर्पित : तडवळकर

**अक्कलकोट (कटुसत्य वृत्त):-** मला लाभलेले भारतीय जनता पार्टीचे शहर अध्यक्ष पद व त्याचा कार्यकाल हा स्वामी चरणांना समर्पित असल्याचे मनोगत येथील श्री. वटवृक्ष स्वामी महाराज मंदीरातील स्वामी दर्शनानंतर भारतीय जनता पार्टीचे सोलापूर शहर अध्यक्ष रोहिणीताई तडवळकर यांनी व्यक्त केले.



त्यांनी श्री. वटवृक्ष स्वामी महाराज मंदिरास भेट सहकुटुंब भेट देवून स्वामी समर्थांचे दर्शन घेतले. यावेळी मंदिर समितीच्या वतीने समितीचे चेअरमन महेश इंगळे यांनी रोहिणी तडवळकर व रामभाऊ तडवळकर यांचा श्री स्वामी समर्थांचे कृपावस्त्र, प्रसाद, प्रतिमा देवून यथोचित सन्मान केला. यावेळी रोहिणीताई तडवळकर बोलत होत्या. तडवळकर यांनी अत्यंत कार्यसचोटी आत्मसात करून पक्षाने सोपवलेली

जबाबदारी अत्यंत तळमळीने पार पाडून जनतेची व कार्यकर्त्यांची सेवा करेन असा विश्वास व्यक्त केला. पंतप्रधान मोदी यांचे परिपूर्ण विकासाचे स्वप्न पूर्ण करण्यासाठी जेवढे पक्षासाठी योगदान देता येईल, तेवढे देणार असल्याचे त्यांनी सांगितले. यावेळी प्रथमेश इंगळे, भारतीय जनता पार्टीचे पंचायत राज व ग्रामविकास जिल्हा उपाध्यक्ष रविंद्र वाघमोडे, श्रीशैल गवंडी, मंदिर समितीचे सचिव आत्माराम घाटगे, विश्वस्त महेश गोगी, श्रीकांत मलवे, ऋषिकेश लोणारी, विपुल जाधव, सागर गोंडाळ व अन्य उपस्थित होते.

# पाण्यासाठी अक्कलकोटच्या नागरिकांचा टाहो

**अक्कलकोट (कटुसत्य वृत्त):-** कुरनूर धरणात सध्या ५० टक्के पाणीसाठा असूनही अक्कलकोट शहर व तालुक्याचा पाणीप्रश्न अद्यापही सुटलेला नाही. शहरातील नागरिकांना दर १० ते ११ दिवसांनी पाणी मिळत असून, काही उपनगरांत तर ही स्थिती अधिक गंभीर आहे. समर्थ नगरसारख्या भागात तब्बल २१ दिवसाआड पाणीपुरवठा होत आहे. त्यामुळे धरणात पाणी असूनही नळ कोरडे का? असा संतप्त सवाल नागरिक विचारत आहेत.



कुरनूर धरण हे शहर व परिसरासाठी प्रमुख जलस्रोत आहे. यंदाच्या उन्हाळ्यात अपेक्षेपेक्षा चांगला पाऊस झाल्यामुळे धरणात ५० टक्के जलसाठा उपलब्ध आहे. मात्र या साठ्याचा शहरातील नागरिकांना लाभ मिळताना दिसत नाही. जलसंपत्ती असतानाही शहराचा मोठा भाग दुष्काळग्रस्तासारखा भासत आहे.

शहरात आणि उपनगरांत पाणीपुरवठा करताना नियोजनाचा अभाव स्पष्ट दिसून येतो. जुनाट पाइपलाइन, वेळेवर दुरुस्ती न होणे, पाणी वाया जाणे, बेकायदेशीर नळजोडणी अशा अनेक अडचणी यामागे कारणीभूत ठरत आहेत. त्यातच स्थानिक प्रशासनाकडून स्पष्ट आराखडा देण्यात येत नाही. त्यामुळे नागरिकांचा संयम सुटू लागला आहे.

समर्थनगर भागात तब्बल २१ दिवसाआड पाणी येते. त्यामुळे नागरिकांना खासगी टँकरवर अवलंबून राहावे लागते. अनेक वेळा खासगी टँकर चालकांनी दर वाढवले असून सामान्य माणसासाठी हे परवडणारे राहिलेले नाही यामुळे घरचा अतिरिक्त खर्च वाढला आहे.

प्रशासनाकडून वेळोवेळी 'लवकरच नियमित पाणीपुरवठा सुरू करू' अशी आश्वासने दिली जातात. मात्र प्रत्यक्षात त्यांची अंमलबजावणी होताना दिसत नाही. अनेक वेळा नगरपरिषद आणि पाणीपुरवठा विभाग यांच्यातील समन्वयाचा अभाव देखील अडथळा ठरत आहे.

कुरनूर धरणात अर्धा जलसाठा असतानाही अक्कलकोट शहर पाण्यासाठी तडफडत आहे, ही अत्यंत दुर्देवी बाब आहे. यामागे केवळ निसर्ग नाही तर यंत्रणांची उदासीनताही तितकीच जबाबदार आहे. पाणी हा मूलभूत हक्क आहे आणि तो वेळेवर मिळावा, ही नागरिकांची अपेक्षा आहे.

# शाळेसमोर पान टपरी दिसल्यास दंडासहीत शिक्षेची कारवाई करू

**सोलापूर (कटूसत्य वृत्त):-** सोलापूर शहर आणि जिल्ह्यातील खासगी व सरकारी शाळा परिसरात तंबाखूजन्य पदार्थांची सर्रास विक्री होत आहे. शालेय शिक्षण घेणारे विद्यार्थी व्यसनाधीन होत आहेत. महाराष्ट्र नवनिर्माण विद्यार्थी सेनेच्या वतीने यासंदर्भात माध्यमिक शिक्षणाधिकाऱ्यांना निवेदन दिले. पान टपऱ्यांवर कारवाई न झाल्यास आपल्या कार्यालयासमोर पानपट्टी थाटण्याचाही इशारा देण्यात आला. सोलापूर शहर आणि जिल्ह्यातील शाळा परिसरात असलेल्या पानटपऱ्यांवर कडक कारवाई करावी, अशी मागणी जिल्हाध्यक्ष अभिषेक रंपुरे यांनी केली आहे. यावेळी महाराष्ट्र नवनिर्माण विद्यार्थी सेनेचे राज्य उपाध्यक्ष अमर कुलकर्णी, जिल्हाध्यक्ष अभिषेक रंपुरे, रोजगार व स्वयंरोजगारचे जिल्हा संघटक गोविंद बंदपट्टे, मनविसे शहर उपाध्यक्ष अनिकेत उपासे, संतोष बारटक्के, समर्थ माळगे, अभिषेक इरकल, सैपन जमखंडी, सुनील जगले, वैभव रंपुरे, आकाश देशमुख व मनसैनिक उपस्थित होते.

